दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –१७४ शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-174 Friday, Dt.27 February 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# मुंबई नंतर बारामतीत आ.रोहित पवारांचा हल्लाबोल

बारामती, पुणे प्रतिनिधी

२८ जानेवारी रोजी बारामती येथे एनसीपीच्या दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या चार्टर्ड डशरीक्षशीं विमानाचा भयानक अपघात होऊन त्यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाल्याची घटना पुढे आली होती. याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) आमदार रोहित पवार यांनी आज बारामती पोलीस स्टेशनमध्ये व्हीएसआर व्हेंचर्स प्रा. लि. व विमान नियमांवर नियंत्रण ठेवणाऱ्या डीजीसीए विरोधात लिखित तक्रार दाखल केली. हा अर्ज त्यांनी ऋखठ नोंदवावा अशी मागणी करून ही मुंबई पाठोपाठ दस्तुर खुद्द बारामतीच्या पोलिसांनी देखील गुन्हा दाखल करून न घेतल्यामुळे आता या प्रकरणात घातपातच असल्याची शक्यता स्पष्ट झाली असून यामागे मोठ्या व्यक्तीचा हात असल्याचा थेट आमदार रोहित पवार यांचा आरोप आहे.

रोहित पवार यांनी दावा केला की डीजीसीए ने प्रथम व्हीएसआर कंपनीला साफ चिट दिली आणि विमान सुरक्षा निकषांचे उल्लंघन झाले असलेल्या बाबींची दखल घेतली पाहिजे. अपघातानंतर Accidental Death Report (ADR) नोंदवण्यात आला होता आणि पुढील तपासासाठी प्रकरण सध्या राज्य क्राइम इन्वेस्टिगेशन विभाग कडे हस्तांतरित करण्यात आले आहे. या प्रकरणात कोणतीही लपवणूक होऊ नये गंभीर चौकशी आणि दोषींवर योग्य कायदेशीर कारवाई व्हावी.याशिवाय त्यांनी डीजीसीए आणि व्हीएसआरवरील आरोपांसह त्यांच्याकडून ऋखठ नोंदण्याची पुन्हा मागणी केली आहे.

अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेप्रकरणी नागरी उड्डाण संचलनालय अर्थात डीजीसीए आणि व्हीएसआर विमान कंपनीविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी आमदार रोहित पवार प्रचंड आक्रमक झाले आहेत. काल ते याप्रकरणी मुंबईच्या मरिनड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यासाठी गेले होते. मात्र, पोलिसांनी कोणत्याही परिस्थितीत ऋखठ दाखल करुन घेण्यास नकार दिला होता. यावरुन रोहित पवार आणि पोलीस उपायुक्त प्रवीण मुंढे यांच्यात शाब्दिक वादही झाला होता. या सगळ्या घडामोडींनंतर आता मुंबईच्या मरिनड्राईव्ह पोलिसांनी रोहित पवार यांच्या तक्रारीबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

मुंबईच्या मरीनड्राईव्ह पोलिसांकडे रोहित पवार यांनी काल दाखल केलेला अर्ज पुढील तपासासाठी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे मरीनड्राईव्ह पोलिसांनी वर्ग करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वये शाखा, पुणे SIT करत असल्याने रोहित पवार यांनी दाखल केलेला अर्ज पुढे डखढकडे काल वर्ग करण्यात आल्याचे समजते. अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाप्रकरणी व्हिएसआर आणि डीजीसीए यांच्यावर आणि संबंधितांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी तक्रारीतून रोहित पवार यांनी मरीनड्राईव्ह पोलिसांकडे केली होती. त्यावर मरीनड्राईव्ह पोलिसांनी रोहित पवार यांना पत्र देत या प्रकरणाचा तपास SIT करत असल्याने त्यांच्याही तक्रार अर्ज पुढे वर्ग केल्याची माहिती कळवली आहे.

दरम्यान, आज रोहित पवार आणि युगेंद्र पवार हे नागरी उड्डाण संचलनालय अर्थात डीजीसीए आणि व्हीएसआर विमान कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी बारामती तालुका पोलीस ठाण्यात पोहोचले आहेत. या दोघांसोबत पोलीस ठाण्याच्या परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्याप्रमाणावर आले आहेत. तसेच स्थानिक वकिलांची फौजही रोहित आणि युगेंद्र पवार यांच्यासोबत आहे. मात्र, याठिकाणीही पोलिसांकडून गुन्हा दाखल करून घेण्यास असमर्थता दर्शविली जाऊ शकते. पोलीस तक्रार घेतील पण गुन्हा नोंद करून घेण्यास नकार दिला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आता रोहित पवार काय करणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे

सत्ताधारी नेते आणि अजित पवार यांच्या पक्षातील आमदारांवरही निशाणा आज महाराष्ट्राची जनता आणि अजितदादांना मानणारे लोक याविरोधात लढत आहेत, परंतु ज्यांच्या हातात अधिकार आहेत ते पुढे का येत नाहीत ? जर राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या मृत्यूबाबत न्याय मिळवण्यासाठी असा संघर्ष करावा लागत असेल, तर सामान्य जनतेने कोणाकडे दाद मागायची आणि त्यांनी काय करायचे ? असा उद्विग्न सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. आता या सर्व प्रकारावर सत्तेत बसलेले नेते कोणती भूमिका घेतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे.

## अजित पवार विमान अपघात प्रकरणात डीजीसीए व व्हीएसआर वर तक्रार दाखल पण बारामतीत सुद्धा गुन्हा दाखल झाला नाही..?



### मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात मोठा राडा

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघात प्रकरणाला आता एक नवे वळण लागले आहे. या अपघातप्रकरणी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयावर अधिकृत गुन्हा दाखल व्हावा, या मागणीसाठी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार, आमदार अमोल मिटकरी आणि संदीप क्षीरसागर हे मुंबईतील मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात पोहोचले होते. मात्र, यावेळी या नेत्यांची आणि पोलिसांची मोठी शाब्दिक चकमक उडाल्याचे पाहायला मिळाले. पोलिसांनी सदर प्रकरणात एफआयआर नोंदवून घेण्यास थेट नकार दिल्याने रोहित पवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### काय घडले मुंबईच्या पोलीस ठाण्यात..?

पोलीस ठाण्यात पोहोचल्यानंतर सुरुवातीला एका कनिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने हा गुन्हा दाखल होऊ शकत नसल्याचे सांगितले. यावर रोहित पवार यांच्यासोबत असलेल्या वकिलांनी पोलिसांना नवीन 'पीएनएस' कायद्याची सविस्तर माहिती दिली आणि हा गुन्हा कसा दखलपात्र ठरतो, हे कायदेशीररीत्या समजावून सांगितले.

कायद्याची बाजू समजल्यानंतर पोलिसांनी एफआयआर नोंदवण्यासाठी लॅपटॉप आणला आणि रोहित पवार यांचा अधिकृत जबाब टाईप करण्याची तयारी सुरू केली. मात्र, ऐन वेळी तिथे एका मोठ्या पोलीस अधिकाऱ्याने प्रवेश केला आणि त्यांनी ही सर्व प्रक्रिया थांबवली. 'आम्ही हा एफआयआर दाखल करून घेणार नाही,' अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. यानंतर रोहित पवार आणि पोलीस उपायुक्त प्रवीण मुंडे यांच्यात जोरदार शाब्दिक बाचाबाची झाली. तुमचा अधिकार असला तरी आम्ही एफआयआर नोंदवू शकत नाही. तुम्हाला जी कारवाई करायची आहे ती करा, ज्यांच्याकडे जायचे आहे तिथे जा आणि ज्याला सांगायचे आहे त्याला सांगा, असे मुंडे यांनी सांगितल्याचा दावा रोहित पवार यांनी केला आहे. या धक्कादायक प्रकारानंतर, 'नेमका कोणाचा फोन आल्यामुळे डीसीपींनी आपला निर्णय बदलून असा पवित्रा घेतला?' असा थेट आणि खळबळजनक सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

### २५ विमानांपैकी केवळ ५ विमानांवरच कारवाई

डीजीसीएने 'व्हीएसआर' या संबंधित विमान कंपनीवर कारवाई केल्याचे एक परिपत्रक जारी केले होते. परंतु, कंपनीच्या एकूण २५ विमानांपैकी केवळ ५ विमानांवरच ही कारवाई मर्यादित ठेवण्यात आली आहे.

**पोलिसांच्या दुटप्पी कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह –** जर राज्यात किरकोळ चोऱ्यांच्या, छोट्या अपघातांच्या घटनांमध्ये आणि अगदी दिल्लीतील एखाद्या कार्यक्रमात काँग्रेस कार्यकर्त्यांनी शर्ट काढल्याच्या प्रकरणातही तत्काळ एफआयआर दाखल केला जातो, तर मग महाराष्ट्राच्या एवढ्या मोठ्या नेत्याच्या म्हणजेच अजितदादांच्या मृत्यूप्रकरणी गुन्हा का दाखल होऊ शकत नाही ? अजितदादांसाठी वेगळा न्याय का लावला जात आहे ?यापुढे जाऊन रोहित पवार यांनी आपली पुढची भूमिका स्पष्ट केली.






संपादकीय....

# मुजोर अन् महामूर्ख!

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा विविध देशांवर टॅरिफ लादण्याचा निर्णय शुक्रवारी बेकायदेशीर ठरवल्यानंतर आता जगातील सर्वच देशांवर सरसकट १० टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली. विशेष म्हणजे भारतासोबत व्यापार करारात कोणताही बदल होणार नाही. भारताला टॅरिफ भरावेच लागेल, पण अमेरिका कोणतेही टॅरिफ भरणार नाही, असे ट्रम्प यांनी जाहीर केले. मात्र, भारताकडून आता १८ ऐवजी १० टक्के टॅरिफ वसूल केले जाईल, असे स्पष्टीकरण व्हाईट हाऊसच्या अधिका-याने दिले आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांचा टॅरिफ लादण्याचा निकाल बेकायदेशीर ठरवल्यानंतर भारतासह अनेक देशांना दिलासा मिळाला होता परंतु आता तो क्षणभंगुर ठरला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर काही तासांतच ट्रम्प यांनी १५० दिवसांसाठी १० टक्के तात्पुरते आयातशुल्क लागू करणारी जाहिरात जारी केली. २४ फेब्रुवारीपासून हे तात्पुरते शुल्क लागू होणार आहे.

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी डोनाल्ड ट्रम्प यांना जोरदार दणका देताना, त्यांच्याकडून दुस-या देशांवर लादण्यात येत असलेले टॅरिफ बेकायदेशीर ठरवले होते. ट्रम्प यांनी विविध देशांवर टॅरिफ लादताना त्यांच्या अधिकारांच्या मर्यादांचे उल्लंघन केल्याचे सुप्रीम कोर्टाने म्हटले होते. राष्ट्रीय आपत्कालीन स्थितीत लागू करण्यात येणा-या कायद्याचा वापर करत ट्रम्प यांनी टॅरिफ लादल्याचे कोर्टाने आपल्या निर्णयात म्हटले होते. या निर्णयाने अमेरिकेच्या राजकारणात आणि अर्थव्यवस्थेमध्ये मोठी खळबळ उडाली. कोर्टाने ट्रम्प यांच्या टॅरिफला थेट बेकायदेशीर म्हटले आहे. राष्ट्राध्यक्षाला काही आणीबाणीचे अधिकार असले तरी त्यात जकात आणि टॅरिफ लादण्याच्या अधिकाराचा समावेश नाही. अमेरिकेच्या संविधानानुसार कर आणि टॅरिफ लादण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना नसून काँग्रेस म्हणजेच संसदेला आहे. ट्रम्प यांनी जागतिक स्तरावर लादलेले सर्व आयात शुल्क (टॅरिफ) बेकायदेशीर ठरवत सुप्रीम कोर्टाने सर्व टॅरिफ रद्द केले. न्यायालयाने ६-३ अशा मताने ट्रम्प यांच्या टॅरिफला अवैध ठरवले होते.

न्यायालयाच्या या आदेशामुळे ट्रम्प यांचे सर्व शुल्क रद्द होणार नव्हते. स्टील आणि ॲल्युमिनियमवरील शुल्क वेगवेगळ्या कायद्यांतर्गत लादण्यात आले होते, त्यामुळे ते लागू राहणार होते. मात्र, शुल्काच्या दोन प्रमुख श्रेणी निलंबित होणार होत्या.

# प्रा.डॉ.एस.एन.वाघुले म्हणजे ग्रामीण मातीतून उगवलेला ज्ञानदीप

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय येथील उपप्राचार्य तथा वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. श्री. एस. एन. वाघुले हे शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त महाविद्यालयात विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिक्षणमहर्षी माजी आ. भीमराव धोंडे साहेब (संस्थापक अध्यक्ष, आनंद चॅरिटेबल संस्था) हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव डॉ. अजय दादा धोंडे व कोषाध्यक्ष अभयराजे धोंडे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी दिली.

प्रा. डॉ. श्री. वाघुले हे महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच वाणिज्य विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. तब्बल ३६ वर्षांच्या अखंड सेवाकाळात त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी आणि सर्वांगीण प्रगतीसाठी भरीव योगदान दिले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी जिद्दीने व समर्पणभावाने कार्य करत विभाग उभा केला. त्यांच्या नेतृत्वाखाली वाणिज्य विभागाने अनेक शैक्षणिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना सक्षम मार्गदर्शन दिले. शिस्तप्रिय, कर्तव्यनिष्ठ आणि विद्यार्थ्यांविषयी अपार तळमळ असलेले प्रो. डॉ. श्री. वाघुले हे आदर्श शिक्षक म्हणून ओळखले जातात. प्राध्यापक हा समाजपरिवर्तनाचा महत्त्वाचा घटक असतो, याची प्रचिती त्यांच्या कार्यातून सतत आली. भविष्यातील विचारवंत, कलाकार, लेखक, तत्त्वज्ञ, डॉक्टर, अभियंते, पत्रकार आणि पुढारी घडविण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते. जसा कुंभार मातीच्या गोळ्याला आकार देऊन सुंदर प्रतिकृती घडवतो, त्याचप्रमाणे शिक्षक विद्यार्थ्यांच्या कोऱ्या मनावर योग्य संस्कार करून जबाबदार नागरिक घडवतात ही भूमिका त्यांनी आयुष्यभर जपली. आई-वडिलांनंतर शिक्षक हे विद्यार्थ्यांचे अप्रत्यक्ष पालक असतात, ही भावना त्यांनी कृतीतून दाखवून दिली. त्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर विद्यार्थ्यांना जीवनमूल्ये, संस्कार, परंपरा आणि आदराची शिकवण दिली. आजही माजी विद्यार्थ्यांची ख्याली-खुशाली प्रेमाने विचारणे, आरोग्याबाबत सतत मार्गदर्शन करणे आणि हसतमुखाने संवाद साधणे हे त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांपैकी आहे. कोणताही भेदभाव न करता गरीब-श्रीमंत सर्व विद्यार्थ्यांशी समानतेने वागणे ही त्यांची मोठी जमेची बाजू राहिली आहे.

प्रो. डॉ. श्री. एस. एन. वाघुले यांच्या सेवापूर्ती सोहळ्यास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी तसेच माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करताना महाविद्यालय परिवार कृतज्ञतेची भावना व्यक्त करत असून, पुढील आयुष्यासाठी त्यांना निरोगी व सुखी जीवनाच्या शुभेच्छा देत आहे.



१ मार्च १९६६ रोजी देवीनिमगाव येथे मामाच्या गावी एका साध्या कुटुंबात प्रो. डॉ. श्री. एस. एन. वाघुले यांचा जन्म झाला. ग्रामीण वातावरणात वाढलेले हे बालक पुढे हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा दीप प्रज्वलित करेल, याची कल्पना त्या वेळी कुणालाही नव्हती. लहानपणापासूनच शिक्षणाची ओढ त्यांच्या मनात निर्माण झाली. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण त्यांनी कोल्हेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत पूर्ण केले. याच ठिकाणी त्यांच्या ज्ञानप्रवासाची बीजे रोवली गेली आणि अभ्यासू वृत्तीचा मजबूत पाया घातला गेला. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी दादेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत घेतले. मर्यादित साधनसंपत्ती, ग्रामीण अडचणी आणि परिस्थितीतील संघर्ष असूनही त्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आपली वाटचाल सुरू ठेवली. मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस आणि ती पूर्ण करण्यासाठी अहोरात्र परिश्रम करण्याची तयारी याच काळात त्यांच्या स्वभावात दृढ झाली. उच्च शिक्षणासाठी त्यांनी आष्टी येथील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. अकरावीपासून बी.कॉम.पर्यंतचे शिक्षण त्यांनी येथे यशस्वीरित्या पूर्ण केले. पुढे गुणवत्तेच्या बळावर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ च्या वाणिज्य विभागात प्रवेश मिळवला. एम.कॉम.मध्ये त्यांनी प्राविण्य मिळवून विद्यापीठाच्या मेरिटमध्ये प्रथम ११ विद्यार्थ्यांमध्ये स्थान पटकावले. त्याच गुणवत्तेच्या जोरावर त्यांनी एम.फिल.साठी प्रवेश निश्चित केला. १९९१ साली एम.फिल.च्या सैद्धांतिक परीक्षा पूर्ण करून १९९२ साली त्यांनी एम.फिल. पदवी संपादन केली.

१९९२ साली गावी परत येत त्यांनी रोडेश्वर विद्यालय, डोंगरगाव येथे शिक्षक म्हणून आपल्या सेवाकार्याची सुरुवात केली. विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना शिक्षणाची गोडी लावणे आणि त्यांच्या क्षमतांना योग्य दिशा देणे हेच त्यांचे ध्येय बनले. १९९३ हे वर्ष त्यांच्या आयुष्यात विशेष ठरले. याच वर्षी त्यांनी आनंदराव धोंडे महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू होऊन कार्यभार स्वीकारला. सेवानिवृत्तीपर्यंत त्यांनी अखंड निष्ठेने आणि समर्पणभावाने सेवा बजावली. त्यांच्या सेवाकाळात ७५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मासिकांमध्ये संशोधनपर लेख प्रकाशित झाले. ५४ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सहभाग घेऊन त्यांनी शोधनीबंध सादर केले. त्यांनी ३५ कार्यशाळा, ६ राष्ट्रीय आणि ४ आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांचे यशस्वी आयोजन केले. थायलंड व दुबई येथे जाऊन आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग नोंदवत त्यांनी आपले संशोधन जागतिक पातळीवर पोहोचवले.

१९९१ साली त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातही नवीन अध्याय सुरू झाला. सौ. सुनंदा यांच्यासोबत त्यांनी विवाहबंधनात प्रवेश केला. परस्पर सन्मान, समजूतदारपणा आणि साथ या मूल्यांवर उभा राहिलेला त्यांचा संसार ज्ञान, संस्कार आणि कर्तृत्वाने समृद्ध झाला. १९९३ साली मोठ्या कन्या शिल्पाचा जन्म झाला. त्यांनी बीएएमएस व एमडी (मेडिसिन) पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आणि उद्योजक श्री. सागर रतन ताम्हाणे यांच्याशी विवाहबद्ध झाल्या. १९९५ साली सुपुत्र सागर यांचा जन्म झाला. त्यांनी निट पात्रता मिळवून सध्या पीएच.डी. संशोधन सुरू ठेवले आहे. त्यांची पत्नी सौ. प्रेरणा धोंडे यांनी एम.एस्सी. (केमिस्ट्री) पूर्ण करून मुंबई विद्यापीठातून पीएच.डी. संशोधन सुरू केले आहे. १९९७ साली धाकटी कन्या सोनालीचा जन्म झाला. त्यांनीही बीएएमएस पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात आपले पाऊल रोवले. त्यांच्या तिन्ही अपत्यांनी उच्च शिक्षणाच्या माध्यमातून कुटुंबातील ज्ञानपरंपरा अधिक बळकट केली.

संशोधन क्षेत्रात त्यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. आजपर्यंत २१ पीएच.डी. संशोधकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनकार्य केले आहे. त्यापैकी १७ जणांना पीएच.डी. पदवी प्रदान झाली असून उर्वरित ४ जणांना लवकरच पदवी प्राप्त होणार आहे. प्रत्येक संशोधक म्हणजे त्यांनी घडवलेला एक स्वतंत्र विचारवंत आणि समाजासाठी सक्षम बौद्धिक शक्ती आहे. आज सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर उभे राहून त्यांच्या आयुष्याकडे पाहिले, तर हा प्रवास केवळ वर्षांचा हिशोब नाही; तो संघर्ष, परिश्रम, निष्ठा आणि मूल्यांचा सुवर्णइतिहास आहे. ग्रामीण मातीतून उगवलेला हा ज्ञानदीप आज असंख्य विद्यार्थ्यांच्या आयुष्यात प्रकाश पेरत आहे. सेवा संपली असली तरी ज्ञानदानाची परंपरा आणि प्रेरणेचा तेजोमय प्रकाश मात्र सदैव समाजाला दिशा देत राहील. प्रो. डॉ. श्री. वाघुले सरांना सेवापूर्ती निमित्ताने हार्दिक हार्दिक शुभेच्छा.!

**शब्दांकन**
**राजेंद्र लाड,आष्टी ९४२३१७०८८५**

## ॲड राम डोंगरे यांना मारहाण करणारा आरोपी करपे अखेर अटक

### ५ दिवसाची पोलीस कोठडी, एकाही वकिलाने आरोपीचे वकीलपत्र घेतले नाही..!

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा न्यायालयातील नोटरी वकील ॲड राम डोंगरे यांना मारहाण करणारा आरोपी राधाकिसन करपे यास अखेर पोलिसांनी अटक करून बीड जिल्हा न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने आरोपीस ५ दिवसाची पोलीस कोठडीचे आदेश दिले आहेत.

आरोपीचे वकील पत्र बीड जिल्हा न्यायालयातील एकाही वकिलाने घेतले नाही हे विशेष. या प्रकरणातील इतर आरोपी असलेल्या ३ महिला व दोन इसम मात्र अद्याप फरार आहेत.

# मराठी भाषा दिन : अभिव्यक्तीचा उत्सव

छत्रपती संभाजी नगर ।प्रतिनिधी

आपली भाषा ही अभिजात मराठी म्हणून मान्य झाली आहे. अमृतातेही पैजा जिंकणारी आपली ही मातृभाषा आणि ही भाषा बोलण्याचा सार्थ अभिमान आपण बाळगत आहोत कोणत्याही भाषेत असणारे शब्द स्वीकारण्याची आणि त्यानुरूप उत्क्रांत होण्याची क्षमता असल्यामुळे आपली मराठी समृद्ध आणि संपन्न होत आहे, याचाही सार्थ अभिमान आपणास हवा.

दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस महाराष्ट्रात मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. ज्येष्ठ कवी वसंत बापट यांच्या शब्दांत सांगायचे झाले तर भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची, इतिहासाची आणि अस्मितेची वाहक असते. २७ फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांचा जन्मदिन. त्यांच्या साहित्यिक कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो.

मराठी भाषेचा समृद्ध वारसा...


मराठी ही इंडो-आर्यन भाषासमूहातील एक प्रमुख भाषा असून तिचा इतिहास सुमारे एक हजार वर्षांहून अधिक जुना आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या अभंग-ओव्यांनी मराठीला अध्यात्मिक उंची दिली. पुढे शाहिरी परंपरा, पोवाडे, भारुडे, कीर्तन या माध्यमांतून मराठी जनमानसात रुजली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठी प्रशासनाची भाषा बनली. राजकारभारात, किल्ल्यांवरील पत्रव्यवहारात आणि शासननिर्णयांत मराठीचा प्रभावी वापर होत असे. त्यामुळे मराठीला स्वाभिमानाचे आणि स्वराज्याचे प्रतीक मानले जाते.

साहित्य, पत्रकारिता आणि आधुनिक मराठी लोकमान्य टिळकांनी 'केसरी'सारख्या वृत्तपत्रातून मराठी पत्रकारितेला बळ दिले. पुढे प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज अशा अनेक साहित्यिकांनी मराठी साहित्य समृद्ध केले. कादंबरी, कथा, कविता, नाटक, चित्रपट, दूरदर्शन, रेडिओ आणि आता डिजिटल माध्यमांमुळे मराठीची अभिव्यक्ती अधिक व्यापक झाली आहे.आज मराठी भाषा विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, शिक्षण आणि सामाजिक माध्यमांमध्येही प्रभावीपणे वापरली जात आहे. मराठी विकिपीडिया, ब्लॉग्स, यूट्यूब, पॉडकास्ट या माध्यमांतून नव्या पिढीला मराठीची ओढ निर्माण होत आहे.जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी आणि इतर भाषांचा प्रभाव वाढत असला तरी मातृभाषेचे महत्त्व कमी होत नाही. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास विचारांची मांडणी स्पष्ट होते, सर्जनशीलता वाढते आणि संस्कार दृढ होतात.मराठी भाषा दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, दैनंदिन जीवनात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याची शपथ घेण्याचा दिवस असावा. घरात, कार्यालयात, शाळेत आणि सार्वजनिक व्यवहारात मराठीचा सन्मानपूर्वक वापर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मराठी ही केवळ भाषा नाही, तर ती आपली ओळख आहे, संस्कृती आहे, आत्म्याचा आवाज आहे. जय जय महाराष्ट्र माझा म्हणताना ज्या अभिमानाची भावना जागते, तीच भावना मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने अधिक दृढ व्हावी.चला, मराठी भाषा दिनी आपण सर्वांनी मराठीचा गौरव करूया, तिचे संवर्धन करूया आणि पुढील पिढ्यांसाठी हा अमूल्य ठेवा जपूया.

मराठी माझी मायबोली,मराठी माझा बाणा, मराठी माझा अभिमान..!

शब्दांकन..
प्रशांत दैठणकर,
जिल्हा माहिती अधिकारी, बीड




# आधुनिक कर्ण

## सत्ताधाऱ्यांनी निर्माण केलेल्या राजकीय परिस्थितीविरुद्ध लढणे कोणालाच पेलले नाही; आधुनिक कर्ण ठरला करण येंड्रलवार – लढला आणि परास्तही केले.

**किनवट प्रतिनिधी (कचरू जोशी) : भारतीय महाकाव्य महाभारत मधील कर्ण हा केवळ एक योद्धा नव्हता, तर तो पराक्रम, दानशूरता, निष्ठा आणि अद्वितीय युद्धकौशल्य यांचा संगम होता. जन्मतःच कवच-कुंडले लाभलेला, परशुरामांकडून शस्त्रविद्या शिकलेला, धनुर्विद्येत अर्जुनाशी स्पर्धा करणारा कर्ण सर्वार्थाने परिपूर्ण होता. तरीही परिस्थिती, राजकारण, जन्मपरिचयाची छाया आणि वेळोवेळी उभ्या राहिलेल्या अडथळ्यांमुळे त्याला अनेकदा कमी लेखले गेले. महाभारताच्या युद्धातही तो पराक्रमाने लढला; परंतु नियती, शाप आणि राजकीय डावपेच यांमुळे त्याला हवे तसे यश मिळू शकले नाही. सक्षम असूनही परिस्थितीने त्याच्या मार्गात अडथळे उभे केले-हीच कर्णकथेची शोकांतिका.**

याच कर्णाच्या रूपकातून किनवट नगर परिषद निवडणुकीकडे पाहिले, तर येथेही एक विलक्षण साम्य जाणवते. एका बाजूला सत्ता, संघटन, संसाधने आणि ठाम नेतृत्वाचा दावा करणारी प्रबळ राजकीय यंत्रणा उभी होती. निवडणूक जाहीर होताच इच्छुकांची लगबग सुरू झाली; परंतु जसजशी परिस्थिती गुंतागुंतीची होत गेली, तसतसे प्रमुख मानले जाणारे उमेदवार एकामागोमाग माघार घेऊ लागले. जणू रणांगण सजले होते, पण धनुर्धारी पुढे यायला धजावत नव्हते. अशा वेळी, दशकानुदशके सत्तेत असलेल्या गटांविरुद्ध उभे राहणे म्हणजे राजकीयदृष्ट्या अशक्यप्राय आव्हान मानले जात होते. वातावरण असे निर्माण झाले होते की, मतदानापूर्वीच निकाल ठरल्यासारखा भासू लागला. विरोधी विचारसरणीतील कार्यकर्ते संभ्रमात होते; पर्याय कोण, नेतृत्व कोण-हा प्रश्न अनुत्तरित होता.याच पार्श्वभूमीवर शिवसेनेचे युवा नेते करण येंड्रलवार यांनी पुढाकार घेतला. आपल्या मातोश्री नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या नेतृत्वाखाली, मर्यादित साधनसामग्री आणि कार्यकर्त्यांच्या बळावर त्यांनी निवडणुकीच्या रणांगणात उडी घेतली. हा निर्णय म्हणजे आधुनिक कर्णाने धनुष्य उचलण्यासारखाच धाडसी होता. फरक इतकाच-महाभारतातील कर्णाला परिस्थितीने अनेकदा रोखले; पण किनवटचा हा आधुनिक कर्ण परिस्थितीशी



दोन हात करण्यास सिद्ध झाला.करण येंड्रलवार यांनी केवळ उमेदवारी जाहीर केली नाही, तर पूर्ण ताकदीने लढा दिला. शहरातील मुस्लिम, वेलमा, दलित आणि धर्मनिरपेक्ष विचारसरणीच्या मतदारांना एक सक्षम पर्याय उपलब्ध करून दिला. राजकीय विश्लेषकांच्या मते, ही निवडणूक केवळ व्यक्तींची नव्हती; ती पर्याय विरुद्ध एकाधिकार, संधी विरुद्ध दबाव आणि लोकशाही विरुद्ध पूर्वनिश्चिततेची होती.

निकाल लागला तेव्हा ३९९६ मतांच्या प्रचंड फरकाने विजय मिळवत करण येंड्रलवार यांनी केवळ प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले नाही, तर लढाई होणारच नाही या समजुतीलाही परास्त केले. हा विजय म्हणजे मतदारांनी व्यक्त केलेला स्पष्ट संदेश होता-लोकशाहीत कोणतीही लढाई आधीच ठरलेली नसते; ती जनतेच्या बोटांवरील शाई ठरवते. संविधान निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अपेक्षित केलेली निर्भय, स्वच्छ आणि पर्यायाधारित लोकशाही हीच या निकालातून अधोरेखित झाली. सत्ता कितीही प्रबळ असली, तरी जनतेचा कौल अंतिम असतो-हा लोकशाहीचा मूलमंत्र किनवटकरांनी पुन्हा एकदा सिद्ध केला.

महाभारतातील कर्ण सर्वगुणसंपन्न असूनही परिस्थितीने त्याला युध्दात सहभागी होऊ दिले नाही; परंतु किनवटचा आधुनिक कर्ण - करण येंड्रलवार - परिस्थितीच्या चौकटी मोडत रणांगणात उतरला, लढला आणि परास्तही केले. त्यामुळे हा विजय केवळ एका उमेदवाराचा नसून, तो पर्याय शोधणाऱ्या आणि लोकशाहीची अब्रू राखणाऱ्या मतदारांचा आहे. राजकीय जाणकारांच्या मतानुसार, या निकालाने भविष्यातील राजकारणाला नवी दिशा मिळू शकते. कारण येथे एका तरुण नेतृत्वाने सिद्ध केले की, परिस्थिती निर्माण करून कुणालाही रोखता येत नाही-जो लढण्याची तयारी ठेवतो, तोच इतिहास घडवतो.

युवा नेते करण येंड्रलवार यांची शिवसेने प्रती असलेली निष्ठा ही त्यांच्या राजकीय प्रवासाची मुख्य ओळख आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे निष्ठावंत शिवसैनिक असलेले विनोद येंड्रलवार हे त्यांचे वडिल असुन वडिलांकडून त्यांना लहानपणापासूनच शिवसेनेचे बाळकडू मिळाले. त्यांच्या आई ह्या या गोकुंदा येथील शिवसेनेच्या जिल्हा परिषद सदस्या होत्या, त्यामुळे संघटनात्मक कार्य आणि पक्षनिष्ठा ही त्यांच्यात घरातूनच रुजली. शिवसेनेत फूट पडून दोन गट निर्माण झाल्यानंतर अनेकांनी राजकीय सोय पाहिली; मात्र करण येंड्रलवार यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची खंबीर साथ देत 'मशाल' चिन्हाशी निष्ठा कायम राखली. तरी २०१९ च्या विधानसभेत महायुती तथा २०२४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांनी महाविकास आघाडीसाठी पूर्ण ताकदीने काम केले. २०२५ च्या नगर परिषद निवडणुकीत शहरात पक्षाची मजबूत संघटनात्मक ताकद नसताना, सत्ताधारी भाजपा व प्रमुख विरोधी पक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांची बळकट यंत्रणा असतानाही त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची साथ सोडली नाही आणि मशाल चिन्हासह नगराध्यक्ष निवडणुकीत प्रचंड मताधिक्क्याने विजय मिळवला. हा विजय त्यांच्या वैचारिक बांधिलकीचा आणि अखंड पक्षनिष्ठेचा पुरावा ठरला. एकंदरित, करण येंड्रलवार यांची शिवसेनेप्रती व ठाकरे घराण्याप्रती असलेली निष्ठा ही परिस्थितीनुसार बदलणारी नसून विचारांशी आणि नेतृत्वाशी असलेली दृढ बांधिलकी दर्शवणारी आहे.

करण येंड्रलवार,
युवा नेता,
शिवसेना,(उ.बा.ठा.),
किनवट/माहूर विधानसभा

# अंबाजोगाई शहरात जबरी चोरी करणारे ४ आरोपी अटक



**स्थानिक गुन्हे शाखेची दमदार कामगिरी**

बीड /प्रतिनिधी

ईसमनामे शेख ईम्रान दस्तगीर, वय २८ वर्ष, व्यावसाय मिस्त्रीकाम, रा होळ ता. केज यांनी दिनांक ०७.०२.२०२६ रोजी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर येथे तक्रार दिली की, फिर्यादी हा सानिका बिअर बार आडस फाटा येथे थांबलेला असताना त्याला त्याचे मित्राने ऑनलाईन पैसे टाकण्यासाठी सांगीतले परंतु त्याचे कडे ऑनलाईन पैसे नव्हते, त्याने बिअर बार चे बाहेर लोकांकडे विचारपुस करण्याकरीता थांबला असताना बिअर बारच्या समोर अंदाजे १८ ते २० वर्ष वयोगटातील तिघेजन मोटार सायकलवर बसुन आले. व फिर्यादीस मोटार सायकलवर बसवुन तुला ऑनलाईन पैसे टाकतो असे म्हणुन आडस रोडला घेवुन जावुन त्याचेकडील बळजबरीने पैसे व मोबाईल हिसकावुन घेवुन पळुन गेले वगैरे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं ४८/२०२६ कलम ३०९(४), ३(५) बी.एन.. एस प्रमाणे दिनांक ०७.०२.२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरील दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध सुरु केला होता. दिनांक २६.०२.२०२६ रोजी पोउपनि/सुतळे यांना गुप्तबातमीदार मार्फत माहीती मिळाली की, वरील गुन्हा हा सुमित अरुण गायकवाड व त्याचे साथीदारासह केला असुन ते सध्या अंबाजोगाई येथे असल्याचे मिळालेल्या माहीतीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अंबाजोगाई शहर परीसरातुन वरील गुन्हयातील आरोपीनामे १. सुमित अरुण गायकवाड, वय २० वर्ष, रा पंचशिल नगर अंबाजोगाई, २. विनय गोविंद जगधने, वय १९ वर्ष, रा संभाजीनगर अंबाजोगाई, ३. विश्वजीत विश्वास गंडले, वय १९ वर्ष, रा लाल नगर अंबाजोगाई व ४. शिवम जनक कसबे, वय १९ वर्ष, रा आर्मी कॉलणी अंबाजोगाई यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडे गुन्हयासंदभनि चौकशी केली असता वर नमुद चार आरोपींनी गुन्हा केल्याचे कबुली दिली आहे. वर नमुद आरोपिंकडुन गुन्हयात बळजबरीने चोरुन नेलेला मोबाईल व गुन्हयात वापरलेली दुचाकी मोटार सायकल जप्त करुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर हे करीत आहेत.

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३२० दि.१८.०८.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **ईश्वर दादासाहेब शिंदे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आकाश ईश्वर शिंदे | मुलगा | ०४.१०.२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९८ दि.२८.०२.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **वसीम खाँ शरीफ खॉ पठाण, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | वसीम खॉ शरीफ खा पठाण | स्वतः | ०१.०७.१९९६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-७९ दि.२८.०२.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **निहाल शरीफ खाँ पठाण, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | निहाल शरीफ खॉ पठाण | स्वतः | ०३.०९.१९८७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-७८ दि.२८.०२.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **तब्बसुम बेगम शरीफ खा पठाण रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तब्बसुम बेगम शरीफ खा पठाण | स्वतः | ०२.०८.१९८९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३१९ दि.२०.०८.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **ईश्वर दादासाहेब शिंदे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रंजित ईश्वर शिंदे | मुलगा | २९.०१.२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २०/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१६५७ दि.२४.१२.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कुसूम आनंता जायभाये रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रियंका आनंता जायभाये | मुलगी | ११.०२.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१६५८ दि.२४.१२.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कुसूम आनंता जायभाये रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वर आनंता जायभाये | मुलगा | २१.०६.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५४७ दि.१९.१२.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **योगिता अरूण मुळे, रा.हरतखेडा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | योगिता अरूण मुळे | मुलगी | १८.०८.२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२९९ दि.१८.०८.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **ईश्वर दादासाहेब शिंदे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | लक्ष्मी ईश्वर शिंदे | मुलगी | २८.०७.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६४९ दि.०१.१०.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **राजेंद्र बळीराम चोरमारे, रा.रामगव्हाण बु. ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रणिता राजेंद्र चोरमारे | मुलगी | ०३.०७.२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०१/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१७४० दि.०७.०१.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नवनाथ रामराव शिंदे, रा.आलमगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शितल नवनाथ शिंदे | मुलगी | २९.०५.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५३ दि.२६.०२.२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रामराव कारभारी वाघ, रा.कर्जत ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रामराव कारभारी वाघ | स्वतः | १०.०९.१९६१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९९२ दि.३१.१०.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **विकास गोरख राठोड रा.बोरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विक्रांत विकास राठोड | मुलगा | १९.०१.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३१/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९९१ दि.३१.१०.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **विकास गोरख राठोड रा.बोरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तेजस्विनी विकास राठोड | मुलगी | ०१.०८.२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३१/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५२३ दि.१६.१२.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रामेश्वर एकनाथ तारख, रा.अंतरवाली सराटी, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वरी रामेश्वर तारख | मुलगी | १७.०३.२०१३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५४६ दि.१९.१२.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **लक्ष्मीकांत अरूण मुळे, रा.हरतखेडा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | लक्ष्मीकांत अरूण मुळे | मुलगा | १८.०९.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या सचिव पदी सुनील क्षीरसागर यांची निवड

बीड / प्रतिनिधी

अहिल्यानगर - बीड - परळी वैद्यनाथ या रेल्वे मार्गा च्या कामाला गती मिळावी तसेच शहरी भागासह ग्रामीण भागामध्ये रेल्वे कामात निर्माण होणे अडथळे प्रशासकीय पातळीवर बैठका घेणे त्याचबरोबर निधी संकल्पसाठी निवेदने सादर करणे यासह अन्य न्याय हक्कासाठी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती मागील अनेक वर्षापासून कार्यरत आहे. या समितीच्या नूतन कार्यकारणी मध्ये अध्यक्षपदी जवाहरलाल सारडा यांची नियुक्ती झालेली होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी ( दि. २५ ) बैठक संपन्न झाली.या बैठकीत सर्वानुमते दैनिक चंपावतीपत्रचे संपादक सुनील नामदेवराव क्षीरसागर यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली.

स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीडची समिती सदस्य अरुण डाके यांचे निवासस्थानी बुधवारी बैठक संपन्न झाली. यावेळी अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सचिव सुनील क्षीरसागर, शांतीलाल पटेल, विष्णुदास बियाणी, रामचंद्र जोशी, अशोक म. शेटे, शिवाजी बन्सी जाधव, सय्यद नवीदुजम्मा, रवी उबाळे, अरुण बाबासाहेब डाके, महम्मद लईक अहेमद, भास्करराव जाधव, तुकाराम साळुंके, विलासराव बडगे, वाय जनार्दन राव, सखाराम मस्के, वैभव स्वामी आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील नगर - बीड - परळी या जिव्हाळ्याच्या रेल्वे मार्गासाठी दैनिक चंपावतीपत्रचे संपादक स्व. नामदेवराव क्षीरसागर यांनी लेखणीच्या माध्यमातूनच स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड माध्यमातून रस्त्यावर उतरून



आंदोलनासह प्रशासकीय पातळीवर देखील भरीव कामगिरी करत बीडकर यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कार्य केले होते. या बैठकीमध्ये त्यांच्या कार्याचा उल्लेख करत उपस्थित त्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत आणि समितीच्या आजपर्यंतच्या कार्याचा अनुभव असणारे त्यांचे चिरंजीव दैनिक चंपावतीपत्रचे संपादक सुनील नामदेवराव क्षीरसागर यांची सचिव पदी नियुक्ती करण्याचा ठराव मांडण्यात आला. यासाठी समितीचे सदस्य विलासराव बडगे यांनी ठराव मांडला यास अरुण डाके आणि वाय जनार्दन राव यांनी अनुमोदन देत सर्वानुमते ठराव पास करत सचिव पदी सुनील नामदेव क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली. या निवडीबद्दल उपस्थितांनी सुनीलराव क्षीरसागर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

### गतीने कामकाज केले जाईल - सुनील क्षीरसागर

स्व. दादांनी नगर बीड परळी रेल्वे मार्गासाठी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीची स्थापना केली.१९८३ पासून या समितीच्या माध्यमातून त्यांनी रेल्वे कामाच्या प्रगतीसाठी पाठपुरावा वेळप्रसंगी आंदोलनात देखील सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांच्याच या कार्याची दखल आणि त्यांच्या समवेत केलेल्या कामाचा माझा अनुभव पाहता समितीने सचिव पदी निवड केली. येणार्या काळातही त्याच ताकतीने आणि गतीने समितीचे कामकाज केले जाईल अशी ग्वाही सचिव पदी निवड झाल्याबद्दल सुनीलराव क्षीरसागर यांनी दिली. यावेळी त्यांनी सचिव पदी निवड केल्याबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानले.



## एनएमएमएस परीक्षेत बाळनाथ विद्यालयातील विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

बीड ।प्रतिनिधी

एन एम एम एस चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, चाकरवाडी येथील बाळनाथ विद्यालयाने घवघवीत यश संपादन करत ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. या परीक्षेत शाळेतून प्रथम क्रमांक अमर सतीश ताटे, द्वितीय क्रमांक जानवी जीवन करपे, तर तृतीय क्रमांक अदिती अशोक कदम यांनी मिळवला. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे. कठोर परिश्रम, नियमित अभ्यास आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले.ग्रामीण भागात शैक्षणिक चळवळ उभी करण्याचे आणि शाळा सक्षम करण्याचे कार्य मा. विनायकराव मेटे यांनी केले आहे. त्यांच्या प्रेरणेने शाळा सातत्याने प्रगतीपथावर आहे. विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. ज्योतीताई मेटे यांनी केले.या यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कारासाठी आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी डॉ. ज्योतीताई मेटे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पाढऱ्याचीवाडी गावचे माजी सरपंच नितीन बप्पा ताटे, चाकरवाडीचे सरपंच विनोद कवडे, पत्रकार अभिजीत पवार, माजी विद्यार्थी डॉ. आदित्य चौधरी तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना मुख्याध्यापक जगताप सर यांनी केली. त्यांनी एन एम एम एस ही विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची स्पर्धा परीक्षा असून, अशा परीक्षांमुळे आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक वृत्ती वाढते,

---

क्र.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि..२६/०२/२०२६

### जाहीरनामा

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**
**जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस **तालुका अंबाजोगाई** यांना जाहिर केले जाते की, **अर्जदार सलीमखान अजमखान पठाण रा. फलॉअर्स क्वॉर्टर अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड यांची मुलगी नामे अनमतुबा सलीमखान पठाण यांचा जन्म दि. १५.०६.२००२ रोजी राहत्या घरी फलॉअर्स क्वॉर्टर अंबाजोगाई** येथे झाला आहे असून अर्जदारांनी जन्म कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदार यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार अंबाजोगाई**

---

क्र.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि..२६/०२/२०२६

### जाहीरनामा

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**
**जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस **तालुका अंबाजोगाई** यांना जाहिर केले जाते की, **अर्जदार सलीमखान अजमखान पठाण रा. फलॉअर्स क्वॉर्टर अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड यांचा मुलगा नामे असलम खान सलीमखान पठाण यांचा जन्म दि. ०७.०५.२००१ रोजी राहत्या घरी फलॉअर्स क्वॉर्टर अंबाजोगाई** येथे झाला आहे असून अर्जदारांनी जन्म कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदार यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार अंबाजोगाई**

---

### जाहीर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१७८/२०२५**
**अभिनंदन दत्तात्रय येडे** विरूध्द **गामपंचायत कार्यालय अंजनवती**

पहा.
**अभिनंदन दत्तात्रय येडे, रा.अंजनवती ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञा मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन मयत **भगवान रावसाहेब येडे** यांचा **दिनांक १५.०४.२०१०** रोजी मृत्यू झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यू यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **अंजनवती** ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबील दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे अंजनवती ता.जि.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२४.०२.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारिख २४.०३.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४२/२०२६**
लक्ष्मण विरुध्द निरंक

**(मार्फत-ॲड.एस.डी.सानप)**

ज्याअर्थी मयत नामे **भानुदास पि.गिरजा खरात हे या दि.१४.०८.१९७६ रोजी मौजे रोहितळ, ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **अर्जदार १) लक्ष्मण पि. भानुदास खरात वय ७० वर्षे धंदा- शेती रा. रोहीतळ ता. गेवराई जि. बीड २) मच्छींद्र पि. भानुदास खरात वय ७५ वर्षे धंदा- शेती रा. रोहीतळ ता. गेवराई जि. बीड ३) यमराज पि. भानुदास खरात वय ६८ वर्षे धंदा- शेती रा. रोहीतळ ता. गेवराई जि.बीड ४) धोंडाबाई भ्र. महादेव कानडे वय ५७ वर्षे धंदा- शेती रा. नाळवंडी ता. गेवराई जि. बीड ५) सुमनबाई भ्र. बबन कांबळे वय ५० वर्षे धंदा- शेती रा. भांबेरी ता. अंबड जि. जालना** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **भानुदास पि.गिरजा खरात** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०८/०४/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२७/२०२६**
संतोष विरुध्द निरंक

**(मार्फत-ॲड.एस.डी.सानप)**

ज्याअर्थी मयत नामे **जगन्नाथ पि.मारूती गर्कळ हे दि.१७.११.२०२५ रोजी भगवान नगर, गेवराई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **अर्जदार १) संतोष पि. जगन्नाथ गर्कळ वय ४८ वर्षे धंदा- नौकरी रा. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड २) संदिप पि. जगन्नाथ गर्कळ वय ४५ वर्षे धंदा- शेती रा. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड ३) तारामती ब्र. जगन्नाथ गरकळ वय ६९ वर्षे धंदा- घरकाम रा.भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड ४) सविता भ्र. रामनाथ थोरे वय ५० वर्षे धंदा- घरकाम रा. सिडको, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद.** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **जगन्नाथ पि.मारूती गर्कळ** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०२/०४/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

## उद्या २८ फेब्रुवारी रोजी वाशिम येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन

वाशिम ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता वैकंठधामवासी मातोश्री सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर वाटाणे लॉन वाशिम येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार व पदाधिकारी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे यांनी दिली आहे.


या राज्यस्तरीय पत्रकार संम्मेलनाचे उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे. सहउद्घाटक म्हणून महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकंत्री ना. दत्तात्रय भरणे राहतील. विशेष आशिर्वाद उपस्थिती म्हणून आयोध्या मंदिर कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज यांचे बंधू भागवताचार्य प.पु. रमाकांत व्यास,पाध्यक्ष राजु भांदुर्गे, महाराष्ट्र संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे. राज्य संघटक संजय भोकरे,डिजीटल मिडिया अध्यक्ष सिध्दार्थ भोकरे,प्रसिध्दीप्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश उपाध्यक्ष महेश पानशे,किशोर रायसाकडा, अशोक देडे,डॉ. अभय कुमार दांडगे, संपर्क प्रमुख वैभव स्वामी,कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल रहाणे,विदर्भ प्रमुख नयन मोंढे, पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरटे,नागपूर विदर्भ प्रमुख अनुपम कुमार भार्गव,विशेष अतिथी म्हणून सहकार मंत्री ना. आकाश फुंडकर, कॅबीनेट मंत्री ना. संजय राठोड, , विभागीय अध्यक्ष सुनिल फुलारी, चर्मकार समाज जिल्हाध्यक्ष दिपक ढोके उपस्थित राहणार आहेत.

दुपारी २ ते ३ वाजता पत्रकारांचा डिएनए काय ? व अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण तर होत नाही ना ? या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.यामध्ये राज्यसंघटक सिध्दार्थ भोकरे, जेष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे, प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकोडे, प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे सहभागी होतील. चर्चासत्राचे संचालन प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी करतील. दुपारी ३ ते ४ च्या दरम्यान पदाधिकारी सन्मान सोहळा व ४ ते ५ वाजेपर्यंत द्वितीय प्रबोधन सत्र पार पडतील यामध्ये जेष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे हे सायबर युगातील माध्यमे आणि मुल्यनिष्ठ पत्रकारीता या विषयावर मार्गदर्शन करतील. प्रबोधन सत्राचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ संघटक संजय भोकरे, अध्यक्षस्थानी ॲड. सौ. भारती सोमाणी, प्रमुख अतिथी सौ. वृषाली टेकाळे हे राहतील. यावेळी संत विचारातून अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विषयावर प्रचार प्रमुख गोपाल कडू मार्गदर्शन करतील. सभाध्यक्ष सर ह.भ.प. प्रकाश महाराज वाघ, उद्घाटक दामोदर पाटील गुरजी, विशेष अतिथी बाबाराव पाटील राहतील. सदर कार्यक्रमामध्ये सहकार्य करणार्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पत्रकार बांधव यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन निमंत्रक आ. शाम खोडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे,निलेश सोमाणी, स्वागताध्यक्ष गिरधारीलाल सारडा, मुख्य समन्वयक डॉ. हरिष बाहेती, सहस्वागतध्यक्ष देवेंद्र खडसे पाटील, कार्याध्यक्ष शिवाजीराव वाटाणे, पत्रकार ॲड. भारती सोमाणी, विदर्भ अध्यक्ष नयन मुंढे, विदर्भ कार्याध्यक्ष अभय खेडकर, विभाग अध्यक्ष सुनिल फुलारी, जिल्हाध्यक्ष किरण क्षार, शहर जिल्हाध्यक्ष पप्पु घुगे, इलेक्ट्रॉनिक मिडीया जिल्हाध्यक्ष राम धनगर, सोशल मिडीया जिल्हाध्यक्ष गणेश देगांवकर, डिजीटील मिडीया जिल्हाध्यक्ष कैलास महाजन, सहजिल्हाध्यक्ष संजय खडसे, विदर्भ समन्वयक मोहीत कर्नावट विदर्भ उपाध्यक्ष संजय कडोळे, प्रदेश सदस्य पंकज सोनोने, रवि अंभोरे, नारायण आरु, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती जिल्हाध्यख प्रफुल बानगावकर, जिल्हा उपाध्यक्ष समिर देशपांडे, अमोल अघम, संतोष गुल्हाणे, राजकुमार ठाकूर, संजय राठी, शाम अपूर्वा, बंडू राठोड, शिवाजी खडसे, ॲड. सुरेश टेकाळे, सौ. वृषाली टेकाळे, गोरखनाथ भागवत, विजय घोंगडे, यांनी केले आहे. सदर कार्यक्रमस्थळी प्रवेशद्वाराला विदर्भ केसरी स्व. ब्रजलाल बियाणी तर परिसराला वैकुंठधामवासी सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर नाव देण्यात आले आहे.

### पत्रकार संघाच्या वतीने २०२६ च्या पुरस्काराचे हे ठरले आहेत मानकरी..!

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने यंदाचा उत्कृष्ट संघटक युवा चेतना पुरस्कार किशोर रायसाकडा प्रदेश उपाध्यक्ष पाचोरा जळगाव, उत्तर महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक नयन मोंढे, उत्कृष्ट संघटक अमरावती विदर्भ अध्यक्ष राकेश खराडे रायगड जिल्हा अध्यक्ष,उत्कृष्ट संघटक कोकण विभाग शंकर बोरघरे उत्कृष्ट संघटक चंद्रपूर गडचिरोली, जिल्हाध्यक्ष अनुपम कुमार भार्गव वर्धा उत्कृष्ट संघटक नागपूर विदर्भ, वैभवजी स्वामी प्रदेश संपर्कप्रमुख बीड मराठवाडा उत्कृष्ट संघटक, गणेश देवगावकर जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया वाशिम उत्कृष्ट संघटक, नागेश आदापुरे पंढरपूर पश्चिम महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक, दशरथ चव्हाण जिल्हा अध्यक्ष नवी मुंबई उत्कृष्ट संघटक,पोपटराव गवांदे मु पो इगतपुरी नाशिक जिल्हा उत्कृष्ट संघटक यांना सन्मानीत करण्यात येणार आहे.

---



।। श्री मन्मथस्वामी प्रसन्न ।। रजि. नं. ए-986

# श्री मन्मथस्वामी देवस्थान पंच कमेटी

श्रीक्षेत्र कपिलधार, ता.जि.बीड-431122

## जाहीर सूचना

संत शिरोमणी मन्मथस्वामी देवस्थान पंचकमिटी, श्री क्षेत्र कपिलधार (ता. जि. बीड) यांच्यामार्फत कळविण्यात येते की, संत शिरोमणी मन्मथस्वामी देवस्थान मंदिर परिसर व देवस्थानच्या मालकीच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचे विवाह सोहळे आयोजित करणे, अनधिकृत बांधकाम करणे, तसेच बेकायदेशीर बॅनर, पोस्टर, फलक किंवा जाहिरात साहित्य लावणे यास सक्त मनाई करण्यात येत आहे. सदर निर्णय देवस्थान परिसराची पावित्र्यता, सुव्यवस्था व कायदेशीर हक्क अबाधित राखण्यासाठी घेण्यात आलेला आहे. यापुढे नमूद मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा संबंधितांविरुद्ध लागू कायद्यांनुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/अध्यक्ष
श्री मन्मथस्वामी देवस्थान पंच कमेटी
श्री क्षेत्र कपिलधार, ता. जि. बीड 431122

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# एनएमएमएस परीक्षेत खुंटेफळच्या लोकमान्य विद्यालयाची मोहोर

## सहा विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश

आष्टी - (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठीच्या (एनएमएमएस) शिष्यवृत्ती परीक्षेच्या २०२६ च्या निकालात आष्टी तालुक्यातील खुंटेफळ येथील लोकमान्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची छाप उमटवली आहे. दि. २४ फेब्रुवारी रोजी जाहीर झालेल्या निकालात शाळेतील तब्बल सहा विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेचे व तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.



ग्रामीण व अति ग्रामीण भागात १९५६ पासून ज्ञानदानाचे अखंड व्रत जोपासणाऱ्या लोकमान्य विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. आर्थिक दुर्बल घटकांतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणारी एनएमएमएस परीक्षा ही अत्यंत स्पर्धात्मक व महत्त्वाची मानली जाते. अशा कठीण परीक्षेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या जिद्दीचे, चिकाटीचे आणि अथक परिश्रमाचे प्रतीक आहे.

या राज्यस्तरीय परीक्षेत सार्थक रामदास घोडे, प्रविण परमेश्वर काकडे, अल्फाज लतीफ शेख, तनुजा हनुमान गाडे, कल्याणी बाळासाहेब थोरवे आणि वैष्णवी भारत उदमले या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी केलेली ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन आणि नियोजनबद्ध तयारी महत्त्वाची ठरली. आर. यु. बोडखे, जे. आर. काकडे, जे. यु. वाळके, पी. के. नरवडे, ए. जी. भालेराव आणि अशोक बाळासाहेब थोरवे या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करून त्यांना यशाच्या शिखरावर पोहोचवले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सचिव ॲड. हनुमंतराव थोरवे, युवा नेते धैर्यशील थोरवे आणि विद्यालयाचे प्राचार्य रविकांत सुंबरे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, खुंटेफळचे सरपंच, उपसरपंच आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश म्हणजे गुणवत्तेचा झरा खेड्यापाड्यातही तितक्याच ताकदीने वाहतो याची प्रचिती देणारे ठरले आहे.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत ओंकार शिंदे यांची उंच भरारी

## १४ फूट उंच उडी मारत जिल्ह्यात प्रथम

आष्टी - (प्रतिनिधी) शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत आष्टी तालुक्याने दमदार कामगिरी नोंदवली असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाळुंज, केंद्र जामगाव, ता. आष्टी येथील विद्यार्थी चि. ओंकार अंकुश शिंदे याने उंच उडी या क्रीडा प्रकारात तब्बल १४ फूट उंच उडी मारत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मोठा गट अंतर्गत झालेल्या या स्पर्धेत ओंकारने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत हा मान मिळवला.



दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी बीड जिल्हा क्रीडा संकूल मैदान येथे या स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. कार्यक्रमास बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर, उपशिक्षणाधिकारी सय्यद अंजूम, अधीक्षक रंगनाथ राऊत, आबासाहेब घायाळ, क्रीडा अधिकारी विद्यागर साहेब, आष्टीचे गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे, यादव फल्लेवाड साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.

ओंकार शिंदे याने सातत्यपूर्ण सराव, चिकाटी, कठोर मेहनत आणि जिद्दीच्या बळावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली. त्याच्या या अभूतपूर्व यशामुळे आष्टी तालुक्याची क्रीडा क्षेत्रातील मान उंचावली असून उंच उडी प्रकारात विजेतेपदाचा मान आष्टीला मिळाला आहे.

या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे, केंद्रप्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक नंदकिशोर होगाडे, सरपंच सुरेश सातपुते, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशोर सोले व सदस्य, तसेच शाळेचे मुख्याध्यापक सय्यद सल्लाउद्दीन, हरिष हातवटे, सचिन वारंगुळे, दत्तात्रय घोरपडे, श्रीमती शबनम काझी, श्रीमती राजामती घोलप आदींनी ओंकारचे अभिनंदन करून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या विजयामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाळुंजचे नाव जिल्हास्तरावर झळकले असून संपूर्ण आष्टी तालुक्यातून ओंकारवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तळणी येथे दामिनी पथकाद्वारे जनजागृती कार्यक्रम संपन्न

तळणी, केंद्र खामगाव (ता. बदनापूर, जि. जालना) - जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथकाच्या वतीने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तळणी, केंद्र खामगाव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचा उद्देश मुलींची सुरक्षितता, महिला सन्मान, बालहक्क आणि सायबर सुरक्षिततेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या मुख्याध्यापकांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

दामिनी पथकातील पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना गुड टच-बॅड टच, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (झजउडज), तसेच आपत्कालीन परिस्थितीत मदत कशी घ्यावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना महिला हेल्पलाईन १०९१, चाइल्ड हेल्पलाईन १०९८ आणि पोलीस आपत्कालीन क्रमांक ११२ यांची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले पोलीस कर्मचारी पुढीलप्रमाणे होते -श्रीमती मीरा ठोके मॅडम, श्रीमती ज्योती राठोड मॅडम, श्रीमती शीला थोरात मॅडम, श्री गौतम बोबडे सर, श्री संभाजी जगताप सर, श्री बालाजी बेले सर व श्री रामेश्वर देशपांडे सर.✻

या सर्व अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विविध उदाहरणांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी मोबाईल व इंटरनेटचा सुरक्षित वापर, अनोळखी व्यक्तींशी संपर्क टाळणे, सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती शेअर न करणे याबाबतही सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रश्न विचारून शंका निरसन करून घेतले.यावेळी शिक्षकवृंद, ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षिततेची शपथ घेतली. शाळेच्या वतीने दामिनी पथकाचे आभार मानण्यात आले.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून ४२ मौलिक ग्रंथांचे प्रकाशन

मुंबई ।प्रतिनिधी

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे यंदा ४२ मौलिक ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. हा प्रकाशन सोहळा नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाजाचे के.टी.एच.एम. महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे.

मंडळाच्या स्थापनेपासून 'पुस्तक प्रकाशन' हे मुख्य उद्दिष्ट ठेवून गंभीर, वैचारिक, संशोधनपर आणि मौलिक विषयांवरील ग्रंथनिर्मिती सातत्याने केली जात आहे. खासगी प्रकाशकांकडून सहसा प्रकाशित न होणारे उच्च दर्जाचे संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित करण्याची जबाबदारी मंडळ पार पाडत आहे. आजवर मंडळाने ७३० हून अधिक ग्रंथ प्रकाशित केले असून दरवर्षी मराठी भाषा गौरव दिनी नव्या ग्रंथांचे प्रकाशन करण्याची परंपरा जपली आहे.

संत, साहित्य, इतिहास आणि संगीताचा वैविध्यपूर्ण पट

यंदाच्या ४२ ग्रंथांमध्ये विविध क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण साहित्याचा समावेश आहे. वारकरी परंपरेतील संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांच्या 'तुकारामबावांच्या अभंगाची गाथा' या ग्रंथाचा समावेश विशेष उल्लेखनीय आहे. तसेच अंजली मालकर लिखित 'हिंदुस्थानी अभिजात संगीताचा इतिहास' (पूर्वार्ध व उत्तरार्ध) या दोन खंडांत तेराव्या शतकापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या संगीत प्रवासाचा अभ्यासपूर्ण आढावा घेण्यात आला आहे.मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्यावरील 'दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर - कर्तृत्वाचा एक शोध' हे तीन खंड प्रकाशित होत असून, त्यातील तिसऱ्या खंडात त्यांनी प्रथम मुद्रित केलेली 'ज्ञानेश्वरी' समाविष्ट आहे.

'शिवशक्ती संप्रदायाची लोक-गान परंपरा', 'महाराष्ट्राचे शिल्पकार विद्वत्तेचा महामेरु डॉ. सी. डी. देशमुख', 'मराठीतील रहस्य-रंजनप्रधान लोकप्रिय कादंबरी परंपरा आणि प्रवाह', तसेच ओडिसी नृत्यशैलीवरील 'ओद्रमागधी ते ओडिसी नृत्य - एक प्रवास' हेही ग्रंथ प्रकाशित होत आहेत.

साहित्यिक परिचय मालिका:१९४० ते १९९० या कालखंडातील महत्त्वाच्या साहित्यिकांवर आधारित परिचयात्मक ग्रंथमालिकेतील ग्रंथांचाही समावेश आहे. यात पु. ल. देशपांडे, नामदेव ढसाळ, विंदा करंदीकर, अण्णाभाऊ साठे, नारायण सुर्वे आदी साहित्यिकांच्या जीवन व साहित्याचा मागोवा घेण्यात आला आहे.

तसेच 'रायगडची जीवनकथा' या ग्रंथाचे आठवे पुनर्मुद्रण प्रकाशित होत असून या ग्रंथाला वाचकांचा मोठा प्रतिसाद लाभला आहे.

नवलेखकांना संधी

मंडळाच्या 'नवलेखक अनुदान' योजनेअंतर्गत यंदा १९ नवोदित लेखकांची पुस्तके प्रकाशित होत आहेत. काव्य, कथा, कादंबरी, नाटक, ललितगद्य आणि बालवाङ्मय अशा विविध साहित्यप्रकारांतील ही पुस्तके असून नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मंडळाचा हा उपक्रम विशेष उल्लेखनीय आहे.

ग्रंथ ऑनलाईनही उपलब्ध

मंडळाचे सर्व ग्रंथ र्हीींिं:// ीरहळीूं.ारीींहळ.र्सीं.ळप या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच शासकीय मुद्रणालय व खाजगी वितरकांकडेही अत्यल्प दरात हे ग्रंथ उपलब्ध आहेत. वाचकांच्या भरघोस प्रतिसादामुळे अनेक ग्रंथांचे पुनर्मुद्रण करावे लागत असल्याचे मंडळाकडून सांगण्यात आले.मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आयोजित या प्रकाशन सोहळ्यामुळे मराठी साहित्य-संस्कृतीच्या जतन व संवर्धनाला मोठी चालना मिळणार आहे.

# स्वामी योगेश राचप्पा एन.एम.एम.एस. परीक्षेत केंद्रात प्रथम

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील श्री छत्रपती संभाजी माध्यमिक विद्यालय मुक्रमाबाद येथील एन.एम.एम.एस. (२०२५-२०२६ )सत्रातील राष्ट्रीय प्रज्ञा शोध परिक्षा घेण्यात आल्या होत्या.यात मुक्रमाबाद येथील श्री छत्रपती संभाजी विद्यालयाचे १७ विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळविले. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक वर्ग ८ वी साठी शिष्यवृत्ती परिक्षा महाराष्ट्र राज्य परिक्षा मंडळ पुणे यांच्या मार्फत प्रति वर्षी परिक्षा घेतल्या जातात. या परिक्षेद्वारे प्रज्ञावान विद्यार्थी निवडले जातात, प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी २०२५-२०२६ साठी हि परिक्षा तालुका स्तरावर मुखेड येथे घेतले गेले या परीक्षेत मुक्रमाबाद येथील श्री छत्रपती संभाजी माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थीनी एकुण ४१ परिक्षेस बसले होतेत्या पैकी १७ विद्यार्थी यश संपादन केले.

स्वामी योगेश राचप्पा १२३ गुण ,कलगंचे शुभांगी नामदेव ११३ गुण,रिशेगावे मनीषा सूर्यकांत १०९ गुण, धुळगंडे ओमप्रिया एकनाथ १०४ गुण, मंत्रे आकाश राजकुमार ९२ गुण, बनबरे प्रथमेश व्यंकट ८६ गुण, कांबळे किशोर कामाजी ८५ गुण, बलुरे प्रगती मारोती ८२ गुण, राठोड प्रदीप रमेश ८१ गुण,गायकवाड साक्षी भास्कर ८१ गुण, राठोड दिव्या वैजनाथ ७९ गुण, इंदुरे मिथिलेश संतोष ७६ गुण, गवळी संध्या शिवाजी ७४ गुण, शेख अरशद सरवर ७४ गुण, औरादे गौरव प्रकाश ७३ गुण, सूर्यवंशी श्रुती राजू ७२गुण, सूर्यवंशी आरती शाम ७२ गुण. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव गजानन पाटील गोरेगावकर ,श्रीनीवास



पाटील गोरेगावकर, मुख्याध्यापक श्री बालाजी भायेगावे सर, खंकरे सर, जाधव सर, गूमडे सर, दूडीले सर, कोठारे सर, खळुरे मॅडम, कुरदुलवाड मॅडम, कौतुक केले. यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांवर पालक व नागरिकां कडुन अभिनंदनाचे वर्षाव होत आहे.

# वनमंत्री गणेश नाईक आणि सभागृहाची दिशाभूल केल्याच्या निषेधार्थ बीड येथे लक्ष्यवेधी आंदोलन

## चला कागदोपत्री झाडे लावूया आणि विश्वविक्रम करूया - डॉ. गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील हरित बीड अभियान अंतर्गत वृक्षलागवड प्रकरणात वनमंत्री गणेश नाईक यांनी सभागृहात दिलेल्या माहितीतून दिशाभूल केल्याचा आरोप करत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज दि.२६ रोजी लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

या वेळी आंदोलनकर्त्यांनी कागदावर झाडांची चित्रे काढत चला कागदोपत्री झाडे लावूया आणि विश्वविक्रम करूया असा उपरोधिक संदेश देत प्रशासनाच्या दाव्यांचा निषेध केला. निवेदन जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत वनमंत्री गणेश नाईक, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड सुनेत्रा




पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना पाठविण्यात आले. आंदोलनात रामनाथ जमाले,शेख युनुस, शेख मुबीन, माजी सैनिक अशोक येडे ( जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), सय्यद सादेक (शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), रामधन जमाले ( बीड जिल्हाध्यक्ष इंटक बीड), किष्किंधा पांचाळ( अध्यक्ष विश्वकल्याण महिला सेवा भावी संस्था बीड), वृक्षप्रेमी अभिमान खरसाडे आदी उपस्थित होते.

# हिंद-दी-चादर : संत-गुरुंच्या वारशातच खरी एकता

कोल्हापूर ।प्रतिनिधी

भारतीय इतिहासात अशा काही अद्वितीय विभूती होऊन गेल्या, ज्यांनी केवळ एका धर्माचे नव्हे, तर संपूर्ण मानवतेचे रक्षण करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. शिखांचे नववे गुरू, 'हिंद-दी-चादर' गुरु तेग बहादूर साहिबजी हे अशाच अजोड त्यागाचे आणि धैर्याचे प्रतीक आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने नागपूर आणि नांदेडनंतर आता नवी मुंबईतील ओवे मैदान, खारघर येथे त्यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचे भव्य आयोजन २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी करण्यात आले आहे.




पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत होणारा हा सोहळा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, गुरु तेग बहादूरजींच्या विचारांतून राष्ट्रीय एकात्मतेची वीण अधिक घट्ट करण्याचा एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक उपक्रम आहे.

नवी मुंबईच्या खारघर येथील ओवे मैदानावर या सोहळ्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली असून, देश-विदेशातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. सुमारे ५ लाख भाविकांची क्षमता असलेल्या या मैदानावर भव्य मंडप उभारण्यात आला असून, मुख्य मंडपात ८० हजार भाविकांच्या बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. लंगर व्यवस्थेसाठी २.५ लाख भाविकांचा विचार करण्यात आला असून आरोग्य सेवेच्या दृष्टीने ५ तात्पुरती वैद्यकीय केंद्रे व १ फिरते आयसीयू केंद्र कार्यान्वित असेल. याशिवाय, जवळील रुग्णालयांमध्ये ३५० खाटा आणि ७५ आयसीयू खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ३० पार्किंग स्थळांची निश्चिती करून विशेष मार्ग योजना आखण्यात आली आहे, जेणेकरून हा सोहळा शिस्तबद्ध पद्धतीने पार पडेल.

आज जगभरात धार्मिक असहिष्णुता आणि तणावाचे वातावरण असताना गुरु तेग बहादूर साहिबजींचा संदेश अधिकच प्रासंगिक ठरतो. त्यांनी दिलेले बलिदान ही केवळ इतिहासातील एक घटना नसून, मानवतेसाठी दिलेला शाश्वत संदेश आहे. त्यांचा खरा इतिहास जगासमोर आणणे म्हणजे केवळ एका महान गुरूंचे स्मरण नव्हे, तर भारतीय लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि मानवी हक्क यांची पुनःप्रतिज्ञा होय. गुरुजींचे योगदान 'सारबत दा भला' अर्थात सर्वांच्या कल्याणाच्या संकल्पनेतून सामाजिक सलोख्याचा पाया घालणारे आहे. या कार्यक्रमातून येणाऱ्या पिढीला केवळ माहितीच नव्हे, तर एक मोठी प्रेरणा मिळेल. महाराष्ट्राने हा सोहळा यशस्वी करून देशाला पुन्हा एकदा हेच दाखवून दिले आहे की, संत-गुरुंच्या वारशातूनच खरी राष्ट्रीय एकता जन्म घेते. अशा या सोहळ्याला आपण सर्वांनी मिळून उपस्थित राहून प्रेरणा घेऊया.

लेखन व संकलन,
सचिन अडसूळ,
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर - (९०४९९८७२९८)

# जिल्हास्तरीय कृषी तंत्र विद्यालय क्रीडा महोत्सवात आष्टीच्या संघाची दमदार कामगिरी;कबड्डीत रौप्यपदकाचा मान



आष्टी - (प्रतिनिधी) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत बीड जिल्हास्तरीय अंतर कृषी तंत्र विद्यालयीन क्रीडा स्पर्धा दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धांचे आयोजन कृषि तंत्र विद्यालय, नवगण (रा.) व घटक कृषि तंत्र विद्यालय, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथे करण्यात आले होते. या क्रीडा महोत्सवात बीड जिल्ह्यातील कृषी तंत्र विद्यालय आष्टी, दासखेड, अंबाजोगाई, देवगाव, लुखामसला व नवगण (रा.) येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्पर्धांमध्ये खो-खो, कबड्डी यांसारख्या सांघिक मैदानी खेळांसह १००, २००, ४०० मीटर धावणे, गोळाफेक, लांब उडी आदी वैयक्तिक क्रीडा प्रकारांचा समावेश होता. कृषी तंत्र विद्यालय, आष्टीच्या विद्यार्थ्यांनी सांघिक तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाचा नावलौकिक उंचावला. विशेषतः कबड्डी संघाने उत्कृष्ट समन्वय, चपळाई आणि जिद्दीचे प्रदर्शन करत अंतिम फेरी गाठली आणि रौप्यपदक पटकावले. संघाच्या या यशामुळे आष्टी विद्यालयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. वैयक्तिक क्रीडा प्रकारातही आष्टीच्या विद्यार्थ्यांनी आपली छाप पाडली. प्रविण झगडे याने गोळाफेक स्पर्धेत रौप्यपदक मिळवून आपली ताकद सिद्ध केली, तर राम काळे याने ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कांस्यपदक पटकावून विद्यालयाच्या यशात भर घातली.

क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन, बक्षीस वितरण व समारोप समारंभ डॉ. भगवान आसेवार (संचालक तथा अधिष्ठाता शिक्षण) आणि डॉ. गजेंद्र लोंढे (सहयोगी अधिष्ठाता, शिक्षण निम्नस्तर) यांच्या हस्ते पार पडले. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कृषी तंत्र विद्यालय, आष्टी येथील संघ प्रशिक्षक प्रा. विष्णू ससाणे, संघ व्यवस्थापक प्रा. उद्धव घुले आणि प्राचार्य प्रा. जे. व्ही. सानप यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही यशस्वी कामगिरी बजावली.

या यशाबद्दल आनंद चॅरिटेबल संस्थाचे संस्थापक अध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे, सहसचिव डॉ. अजय धोंडे, कोषाध्यक्ष अभय धोंडे, प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत तसेच श्री. छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. श्रीराम आरसूळ यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आष्टीच्या कृषी तंत्र विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही विद्यार्थ्यांनी अशाच प्रकारे जिल्हा व राज्य स्तरावर यश संपादन करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महावितरणच्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या कामगिरीचा 'बिग इम्पॅक्ट' पुरस्काराने गौरव




मुंबई ।प्रतिनिधी

सर्वाधिक अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून देशात प्रथम क्रमांक पटकावण्याच्या महाराष्ट्राच्या कामगिरीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या महावितरणचा 'बिग इम्पॅक्ट' पुरस्काराने मुंबई येथे बुधवारी (२५ फेब्रुवारी) गौरव करण्यात आला. मुंबईतील सहारा स्टार हॉटेलमध्ये आयोजित या कार्यक्रमात ९२.७ बिग एफएम या लोकप्रिय रेडिओ चॅनलच्या वतीने विविध क्षेत्रात कल्पकता व नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे समाजावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा पुरस्काराने गौरव करण्यात आला.

मुंबई महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती रितू तावडे आणि अभिनेत्री ईशा देवोल यांच्या हस्ते महावितरणच्या वतीने कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता प्रवीण परदेशी, मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, जेष्ठ अभिनेते बोम्मण ईराणी यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला होती. पुरस्कार वितरणाच्या नेत्रदिपक कार्यक्रमाला तर सिनेसृष्टी, सामाजिक, राजकीय, उद्योग, कला क्षेत्रातील नामवंत उपस्थित होत्या.

# पोलीस पाटील भरती मधील गैरप्रकारामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

## जिल्हाधिकाऱ्यांना कठोर भूमिका घ्यावी लागेल- ॲड. अजित देशमुख

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पोलीस पाटील पदासाठी भरती प्रक्रिया चालू आहे. जिल्हा प्रशासनाने ही भरती पारदर्शकतेने करायचे ठरवले होते. मात्र काही ठिकाणावरून आलेल्या तक्रारीवरून पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.

जिल्ह्यात मोठ्या संख्येने पोलीस पाटील पदे भरण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानंतर परीक्षा केंद्रावर स्वतः जिल्हाधिकारी यांनी देखील भेटी दिल्या. त्यामुळे परीक्षा पारदर्शकतेने होईल आणि पात्र गोरगरिबांना न्याय मिळेल. पात्र व्यक्ती निवडले जातील, अशी आशा होती. मात्र काही ठिकाणच्या तक्रारीवरून बीड जिल्हा सुधारायला तयार नाही, हे स्पष्ट दिसत आहे.

दरम्यान, माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाने एक हजार सोळा उमेदवार पात्र ठरवून मुलाखतीसाठी यादी जाहीर केली होती. ही यादी त्यांनी पटलावर जाहीर केली. यानंतर अनेकांनी या यादीवर आक्षेप घेतले. त्यानंतर उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांनी या यादीमध्ये तांत्रिक चुका झाल्याचे स्पष्ट करत मुलाखतीसाठी निवडलेल्या या उमेदवारांची यादी रद्द केली. यावरून मोठा गैरप्रकार समोर आला आहे. तांत्रिक कारण दाखवणे योग्य नाही. यादी जाहीर करताना ती जबाबदारीने जाहीर केली पाहिजे. मात्र ही जबाबदारी यादी जाहीर करताना कोठे हरवली होती ? हा देखील प्रश्न निर्माण होत आहे.

तर दुसरीकडे परळी येथून प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये एका महिलेने ज्या परीक्षा केंद्रावर होमगार्ड म्हणून नोकरी केली, त्याचवेळी होमगार्ड म्हणून ड्युटी बजावत असताना पोलीस पाटील पदासाठी परीक्षा दिल्याचे उघडकीस आले आहे. या संदर्भात तक्रार देखील झालेली आहे. अशा अनेक गंभीर बाबी समोर आलीने स्वतः जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घातले, तरच पात्र उमेदवारांची या पदावर निवड होणे शक्य होईल. अन्यथा प्रशासनावर जिल्हाधिकाऱ्यांनी भरोसा दाखवला, तर ते चुकीचे ठरेल.

दरम्यान, या संदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे माहिती कळविण्यात आली. त्यांनी या सर्व प्रकारची सत्यता पडताळून पाहण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे यापुढे या नोकर भरती मध्ये गैरप्रकार होऊ नयेत, अशी अपेक्षा आहे.बीड जिल्हा भ्रष्ट कारभाराने नेहमीच गाजत असतो. त्यामुळे पोलीस पाटील पदाच्या होणाऱ्या या मोठ्या भरती मध्ये पात्र उमेदवारच निवडले गेले पाहिजेत. भ्रष्ट मार्गाने यात निवड होऊ नये, यासाठी प्रशासनाबरोबरच जनतेने देखील दक्ष राहणे आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांना कठोर भूमिका घ्यावी लागेल, असे ड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# बीड जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान राबविणार

बीड ।प्रतिनिधी

महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार बीड जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान (टप्पा क्र. १) राबविण्यात येणार असून मंडळ, तालुका तसेच नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने हे अभियान हाती घेण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांच्या महसुली विषयांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचे तात्काळ निराकरण शिबिरांमधून करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात १८ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पूर्वतयारी करण्यात येणार आहे. त्यानंतर ७ व १४ मार्च तसेच १० व १७ एप्रिल २०२६ रोजी मंडळ स्तरावर शिबिरे घेण्यात येतील. नगर परिषद व नगर पंचायत स्तरावरील शिबिरे ८ व १५ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहेत.

या अभियानांतर्गत भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतर, 'जिवंत ७/१२' मोहिमेद्वारे नोंदी दुरुस्ती, प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे आदेश वितरण, 'सर्वांसाठी घरे' अंतर्गत पट्टे वाटप, पाणंद रस्त्यांच्या मान्यता प्रक्रिया तसेच डिजिटल (ठठ कोडयुक्त) ७/१२ बाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

याशिवाय लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत सेवा वितरण, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पीएम किसान सेवा व जनता दरबार सुविधा शिबिरांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महसूल कायद्यातील कलम ४२ अन्वये अकृषिक रूपांतरण प्रक्रियेतील सुधारणा व एकवेळ अधिमूल्याच्या नव्या दरांबाबतही नागरिकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.सदर अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व सर्व संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देण्यात आले असून प्रत्येक शिबिरानंतर विहित नमुन्यात अहवाल सादर करण्यात येणार आहे.जिल्ह्यातील नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## देव देश धर्मासाठी आयुष्य समर्पित करणारे स्वातंत्र्यवीर सावरकर - रूपाली कचरे

माजलगाव ।प्रतिनिधी

येथे भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या कीट्टी आडगाव मंडळाध्यक्ष रूपाली कचरे यांच्या निवासस्थानी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

याप्रसंगी रूपाली कचरे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आठवणीला उजाळा देताना म्हटले की देव देश धर्मासाठी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी आपले संपूर्ण जीवन आत्म



समर्पित केले.आपल्या परिवाराचा देखील विचार न करता देशासाठी धर्मासाठी त्यांनी समर्पण भावनेने संपूर्ण जीवन समर्पित केले.

याप्रसंगी माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी , सरचिटणीस कैलास खुरपे पवन मोगरेकर, रमेश शेंडगे सिद्धेश्वर राठोड शहर उपाध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर भाजपा नेते ईश्वर खुरपे, शहर चिटणीस , विनोद लड्डा ,मनोज कोरडे.युवा नेते संतोष सोळंके रवी वाकळे सह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

# महिलांचे सबलीकरण व नैतिक मूल्यावर प्रा.रवीकुमार ढोकाडे यांचे व्याख्यान संपन्न



मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

आजची महिला ही सक्षम झाली पाहिजे. शिकली पाहिजे व प्रत्येक जिम्मेदारी सांभाळण्यासाठी सशक्त राहिली पाहिजे असे आव्हान प्रा.रवीकुमार ढोकाडे यांनी केले. स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुक्रमाबादचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर मौजे गोणेगाव ता. मुखेड येथे संपन्न होत आहे. या शिबिराच्या दुपारच्या सत्रात महिलांचे सबलीकरण व नैतिक मूल्य या दोन विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या उद्बोधन सत्रातील कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून माजी रासेयो कार्यक्रमाधिकारी


डॉ. सूर्यकांत सकनूरे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.रवींद्र बाविस्कर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. म.गायकवाड यांनी केले. यावेळी व्याख्याते म्हणून प्रा. रवीकुमार ढोकाडे यांनी 'महिलांचे आर्थिक सबलीकरण' या विषयावर आपले विचार मांडले.तर दुसरे व्याख्याते डॉ.रमाकांत बिडवे यांनी 'नैतिक मूल्य' या विषयावर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो सह.कार्यक्रमाधिकारी डॉ.आर.बी.मादळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार स्वयंसेवक विद्यार्थी पारसे अंकुश यांनी मानले.यावेळी विद्यार्थी बेंजलवार यशपाल, रोशन सोनकांबळे, भूमिका शिंदे, प्रियंका गायकवाड, बालाजी सादगिरे व तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाचा सर्व शेतकऱ्यांनी केवायसी करून फायदा घ्यावा - नवनाथअण्णा शिराळे

बीड ।प्रतिनिधी

केंद्र आणि महाराष्ट्रातील भाजपा सरकारने क्रांतिकारी निर्णय घेत महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला आहे.लवकरच शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार असल्यामुळे बीड जिल्ह्यातील तमाम सर्व शेतकरी बांधवांनी आपापली केवायसी करून आधार कार्ड लिंक असलेल्या खात्याची खात्री करून केवायसी करून घ्यावी आणि या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपाचे ज्येष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.




## अर्जुन व्हटकर यांच्या चलबट या आत्मचरित्रात नागपूरचा दया पवार पुरस्कार जाहीर

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.अर्जुन व्हटकर यांच्या चलबट या आत्मकथनास आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर अँड लिटरेचर,नागपूर या संस्थेतर्फे दिला जाणारा 'दया पवार आत्मकथन राज्यस्तरीय पुरस्कार'जाहीर झाला आहे.

या पुरस्काराचे वितरण दिनांक ७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नागपूर येथे णत्रछ चे माजी चेअरमन सुखदेव थोरात यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. अर्जून व्हटकर हे बलभिम महाविद्यालयात शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी आहेत.

# पोलीस पाटील भरती मधील गैरप्रकारामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

## जिल्हाधिकाऱ्यांना कठोर भूमिका घ्यावी लागेल-ॲड. अजित देशमुख

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात पोलीस पाटील पदासाठी भरती प्रक्रिया चालू आहे. जिल्हा प्रशासनाने ही भरती पारदर्शकतेने करायचे ठरवले होते. मात्र काही ठिकाणावरून आलेल्या तक्रारीवरून पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.

जिल्ह्यात मोठ्या संख्येने पोलीस पाटील पदे भरण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानंतर परीक्षा केंद्रावर स्वतः जिल्हाधिकारी यांनी देखील भेटी दिल्या. त्यामुळे परीक्षा पारदर्शकतेने होईल आणि पात्र गोरगरिबांना न्याय मिळेल. पात्र व्यक्ती निवडले जातील, अशी आशा होती. मात्र काही ठिकाणच्या तक्रारीवरून बीड जिल्हा सुधारायला तयार नाही, हे स्पष्ट दिसत आहे.

दरम्यान, माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाने एक हजार सोळा उमेदवार पात्र ठरवून मुलाखतीसाठी यादी जाहीर केली होती. ही यादी त्यांनी पटलावर जाहीर केली. यानंतर अनेकांनी या यादीवर आक्षेप घेतले. त्यानंतर उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांनी या यादीमध्ये तांत्रिक चुका झाल्याचे स्पष्ट करत मुलाखतीसाठी निवडलेल्या या उमेदवारांची यादी रद्द केली. यावरून मोठा गैरप्रकार समोर आला आहे. तांत्रिक कारण दाखवणे योग्य नाही. यादी जाहीर करताना ती जबाबदारीने जाहीर केली पाहिजे. मात्र ही जबाबदारी यादी जाहीर करताना कोठे हरवली होती ? हा देखील प्रश्न निर्माण होत आहे.

तर दुसरीकडे परळी येथून प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये एका महिलेने ज्या परीक्षा केंद्रावर होमगार्ड म्हणून नोकरी केली, त्याचवेळी होमगार्ड म्हणून ड्युटी बजावत असताना पोलीस पाटील पदासाठी परीक्षा दिल्याचे उघडकीस आले आहे. या संदर्भात तक्रार देखील झालेली आहे. अशा अनेक गंभीर बाबी समोर आलीने स्वतः जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घातले, तरच पात्र उमेदवारांची या पदावर निवड होणे शक्य होईल. अन्यथा प्रशासनावर जिल्हाधिकाऱ्यांनी भरोसा दाखवला, तर ते चुकीचे ठरेल.

दरम्यान, या संदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे माहिती कळविण्यात आली. त्यांनी या सर्व प्रकारची सत्यता पडताळून पाहण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे यापुढे या नोकर भरती मध्ये गैरप्रकार होऊ नयेत, अशी अपेक्षा आहे.

बीड जिल्हा भ्रष्ट कारभाराने नेहमीच गाजत असतो. त्यामुळे पोलीस पाटील पदाच्या होणाऱ्या या मोठ्या भरती मध्ये पात्र उमेदवारच निवडले गेले पाहिजेत. भ्रष्ट मार्गाने यात निवड होऊ नये, यासाठी प्रशासनाबरोबरच जनतेने देखील दक्ष राहणे आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांना कठोर भूमिका घ्यावी लागेल, असे ड. देशमुख यांनी म्हटले आहे.




इंदापूर ।प्रतिनिधी

इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब-वालचंदनगर येथे पालक शिक्षक संवाद सभा संपन्न झाली.संस्था सचिव वीरसिंह रणसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सभेचे आयोजन करण्यात आले होते.प्राचार्य डॉ.अशोक काळंगे यांनी आयोजना मागील भूमिका सविस्तरपणे सांगितली. समन्वयक डॉ. तेजश्री हुंबे यांनी पालक-शिक्षक संवादाचे शैक्षणिक, सामाजिक व भावनिक महत्त्व अधोरेखित केले.पालक समुपदेशन सत्रात प्रा.राजेंद्रकुमार डांगे यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, अभ्यासातील सातत्य,अभ्यास सवयी, मूल्यशिक्षण तसेच भविष्यातील करिअर संधी याविषयी पालकांशी सविस्तर संवाद साधला. शैक्षणिक बदलांची माहिती प्रा. डॉ. प्रशांत शिंदे व प्रा. डॉ. विलास बुवा यांनी सादर केली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.अशोक काळंगे यांनी पालकांच्या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विद्या गुळीग यांनी तर प्रा.ज्ञानेश्वर गुळीग यांनी आभार प्रदर्शन केले.

## बीडमध्ये उद्दिष्टापेक्षा जास्त लागवड, ९० टक्के वृक्ष जिवंत - वन मंत्री गणेश नाईक

मुंबई ।प्रतिनिधी

बीड शहरात राबविण्यात आलेल्या वृक्ष लागवड अभियानात प्रत्यक्षात उद्दिष्टापेक्षा जास्त लागवड करण्यात आली असून, त्यापैकी ९० टक्के रोपे जिवंत असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तरादरम्यान दिली.विधानसभा सदस्य चेतन तुपे यांनी विधानसभेत या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.



# जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत पीएमश्री आष्टा ह.ना.शाळेचा दुहेरी विजय

## मुलींच्या लहान व मोठ्या गटातील समूहगीत स्पर्धेत दोन्ही संघ प्रथम; आष्टी तालुक्याचा जिल्ह्यात डंका

आष्टी - (प्रतिनिधी) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरिनारायण शाळेच्या मुलींच्या समूहगीत संघांनी लहान व मोठ्या गटात प्रथम क्रमांक पटकावत दुहेरी यश संपादन केले. आष्टी तालुक्याचे प्रतिनिधित्व करत दोन्ही संघांनी उत्कृष्ट सादरीकरण करत बीड जिल्ह्यात अव्वल स्थान मिळवले. ही स्पर्धा बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी बीड येथील भारत स्काऊट भवन कार्यालयात पार पडली. यावेळी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज़ितीन रहमान, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. किरण कुंवर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रियाराणी पाटील, उपशिक्षणाधिकारी सय्यद अंजूम, अधीक्षक रंगनाथ राऊत, आष्टीचे गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे, यादव पल्लेवाड आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले.

मुलींच्या लहान गटातील (इयत्ता पाचवी) समूहगीत स्पर्धेत खालील विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. श्रेया आदिनाथ भवर, सिद्धी जगदीश भाकरे, सृष्टी सुशील राऊत, स्वरा किरण थोरात, वैष्णवी किरण गळगटे, स्वरा बाळू पठाडे, श्रुती राहुल कराड, काजल शिवाजी खंदारे, रूपाली नानासाहेब गळगटे व अग्नी किशोर पालखे. या विद्यार्थिनींनी सुरेल व तालबद्ध सादरीकरण करत परीक्षकांची मने जिंकली आणि प्रथम क्रमांक पटकावला. मोठ्या गटातील (इयत्ता सातवी व आठवी) समूहगीत स्पर्धेत कल्याणी केशव गीते, श्रावणी ज्ञानेश्वर गीते, जानवी किशोर रणसिंग, विद्या शिवाजी कोल्हे, प्राजक्ता दादासाहेब शिंदे, पंकजा सुनील आंधळे, तनुजा नागेश पठाडे, वैष्णवी श्रीकृष्ण गळगटे, मोनिका गोरख बनगे व साक्षी संजय पठाडे यांनी सहभाग घेतला. या संघानेही उत्कृष्ट गायन कौशल्य सादर करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक सोमनाथ वाळके यांनी वर्षभर विद्यार्थिनींकडून सातत्यपूर्ण सराव करून घेतला होता. मुलींची चिकाटी, जिद्द आणि नियमित मेहनत यामुळे हे यश शक्य झाले.या संघांना शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ मुटकुळे, आदर्श शिक्षक सोमनाथ वाळके, बापू शिंदे, विशाल चव्हाण, शशिकांत खाडे, शिवाजी कोल्हे आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. तसेच मच्छिंद्रनाथ जगताप, नामदेव भिसे, पांडुरंग खोकले, उमेश झांबरे, अर्जुन खंडागळे, विजय महाद्वार, हेमलता तरटे मॅडम, लक्ष्मण खंदारे, परमेश्वर बोडखे, सुनंदा बांगर मॅडम, सुषमा जाधव मॅडम, अशोक रणसिंग, अरुण पवार, अशोक पंडीत आदी शिक्षकांचे सहकार्य लाभले. विजयी संघांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. किरण कुंवर व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रियाराणी पाटील यांच्या हस्ते ढाल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. याच कार्यक्रमात आष्टा शाळेच्या खो-खो विजयी संघालाही चषक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

या यशाबद्दल आष्टी, पाटोदा, शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस, जिल्हा परिषद सदस्या अश्विनीताई अमर निंबाळकर, गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे, ज्येष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी मनोरंजन धस, शिक्षणविस्तार अधिकारी सिमाताई काळे, केंद्रप्रमुख धर्मनाथ शिंदे, केंद्रीय मुख्याध्यापक मधुकर गळगटे, सरपंच दैवशाला गणेश माळवे, उपसरपंच वैभव पठाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष साईनाथ गळगटे तसेच ग्रामपंचायत सदस्य व इतर मान्यवरांनी विद्यार्थिनी व शिक्षकांचे अभिनंदन केले.



# लिव्हरपूल युके मध्ये दुमदुमला शिवरायांचा जयघोष

कंधार -(प्रतिनिधी)

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरातील विविध देशांत मोठ्या जल्लोषात व उत्साहात साजरी केली जाते युनायटेड स्टेट्स लिव्हरपूलमध्ये स्थायिक झालेल्या मराठी बांधवांनी एकत्र येत 'शिवजयंती' साजरी केली त्याचे सर्व स्तरातुन कौतुक केले जात आहे.

शिवजयंतीनिमित्त लिव्हरपूल (युनायटे केंगडम) येथील हिंदु मंदिरात छत्रपती शिवाजी महाराजाची जयंती महाराष्ट्र मंडळ, लिव्हरपूल यांच्या वतीनं पारंपरिक पद्धतीनं साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सूरुवात ढोल ताशाच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचं पुजन आणि पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. 'जय भवानी..जय शिवाजी' अशा विविध घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला गेला. उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या कार्याचा आणि हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या त्यांच्या पराक्रमाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. यावेळी तेथील महाराष्ट्रीयन नागरीकांनी केलेली आपली पारंपरिक वेशभूषा डोळ्याचे पारणे फेडणारी होती.




दिनांक : २८ फेब्रुवारी सकाळी : ९.०० वाजता
सत्यपाल महाराज यांचे शिष्य ह.भ.प. पंकजपाल महाराज यांचा प्रबोधनाचा कार्यक्रम
पुस्तक प्रकाशन : सरुनंदन अगनीक किसन नामदेवराव गंगावणे गुरुजी यांचा नामवेद ग्रंथाचे विमोचन

* पुरस्कार *

* मा.ना. प्रतापराव जाधव केंद्रीय मंत्री (महाराष्ट्र भूषण पुरस्कार)
* भागवताचार्य : मा.रमाकांतजी व्यास (संत सेवाश्री पुरस्कार)
* मा.श्री. दिनकराव वाटाणे (वारकरी सेवा पुरस्कार)
* मा.श्री. राधेश्यामजी चांडक बुलडाणा अर्बन (विदर्भ भूषण पुरस्कार)
* मा.श्री. डॉ. हेमराजजी लाहोटी सुलतानपुर (विदर्भ भूषण पुरस्कार)
* मा.डॉ. हरिष बाहेती व डॉ. सौ. सरोज बाहेती (विदर्भ भूषण पुरस्कार)
* मा.श्री. ह.भ.प. पंकजपाल महाराज (विदर्भ गौरव पुरस्कार)
* मा.श्रीमती शिलाताई राठी अध्यक्षा वाशिम अर्बन बँक (जीवन गौरव पुरस्कार)
* मा.श्री. माधवराव अंभोरे जेष्ठ पत्रकार (जीवन गौरव पुरस्कार)
* मा.श्री. देविदास पाटील राऊत (गोसेवक पुरस्कार)
* जेष्ठ साहित्यीक स्व. भाष्करराव मुंदे (मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार)
* मा.श्री. मिलींदजी भावसार (उद्योजक पुरस्कार)
* मा.श्री. गोपाल गिरधारीलाल सारडा (उद्योजक पुरस्कार)
* मा.श्री. स्वप्नील देवेंद्र खडसे पाटील (उद्योजक पुरस्कार)
* मा.श्री. अमोलजी पाटणकर (ओएसडी मुख्यमंत्री) (वाशिम जिल्हा भूषण पुरस्कार)
* मा.श्री. मोहित कर्नावट शेलुबाजार अर्बन (युथ आयकॉन पुरस्कार)
* मा. हर्षद शर्मा (वास्तु विशारद) (वाशिमरत्न पुरस्कार)
* नंदलाल गोपीकीशन राठी जालना (राज्यस्तरीय पत्रकार भूषण पुरस्कार)
* डॉ. अनिल कावरखे (आरोग्य सेवक पुरस्कार)
* मा. शेखरभाऊ बंग (समाजसेवक पुरस्कार) * मा. अविनाश मारशेटवार (सेवारत्न पुरस्कार)
* मा. शाम सवाई (आदर्श समाजसेवक पुरस्कार) * मा.श्री. प्रविण पट्टेबहादुर (सेवारत्न पुरस्कार)

* संस्था पुरस्कार :
केशव गौरक्षण मंगरुळपीर, छाया फाऊंडेशन वाशिम, वारकरी सेवा संस्था वांगी, पिरॉमिड स्पिरिचुअल सोसायटी मुवमेंट वाशिम, तिरुपती सेवा गृप परिवार, वाशिम

* विशेष सत्कार *
* मा. दिलीपजी हेडा उद्योजक * मा. गिरीषजी लाहोटी उद्योजक * मा. पुरणमल बदलाणी नगरसेवक
* मा. रामदास चांदवाणी उद्योजक * मा. निलेश जिवनाणी उद्योजक * मा. अनिलजी केंदळे नगराध्यक्ष
* मा. सुरेशभाऊ दहात्रे शासकीय कंत्राटदार * मा. गिरीधारीलाल सारडा उद्योजक
* मा. राजुभाऊ देशमुख कंत्राटदार * मा. शेखरभाऊ बंग कारंजा लाड समाजसेवक
* मा. मनिषजी मंत्री उद्योजक * मा. निलेश राठी उद्योजक * ॲड. सुरेश टेकाळे समाजसेवक
* मा. बबनरावजी इंगळे माजी सचिव कृ.उ.बा.स. वाशिम * ॲड. नंदकिशोर राऊत पाटील उद्योजक
* मा. शिवाजीराव वाटाणे (कार्याध्यक्ष आयोजन समिती) * मा. धनश्री पाटील गुरुदेव सेवा मंडळ
* सभापती/सचिव कृ.उ.बा.स. वाशिम * सभापती/सचिव कृ.उ.बा.स. कारंजा
* मा. निलेश गायकवाड मुख्याधिकारी न.प. वाशिम * मा. सतीष शेवदा मुख्याधिकारी न.प. रिसोड
* वाशिम अर्बन बँक, बुलडाणा अर्बन बँक * शेलुबाजार अर्बन बँक
* मा. स्वप्नील देशमुख कंत्राटदार * बाळासाहेब देशमुख जेष्ठ पत्रकार वाशिम
* मा. शिवलाल भुतडा उद्योजक * अभिषेक मुंदडा उद्योजक * प्रा. राजेश गोरुले समाजसेवक
* प्रा. भाऊसाहेब काळे समाजसेवक * श्री. कपूर कंत्राटदार आर.डी. हार्डवेअर

* चर्चासत्र * दुपारी २.०० ते ३.०० वाजेपर्यंत
विषय : पत्रकारांचा डिएनए काय?
व अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण तर होत नाही ना?
सहभाग : मा. सिध्दार्थ भोकरे (राज्य संघटक),
मा. डॉ. राजेश राजोरे (जेष्ठ संपादक खामगांव),
मा. गोविंद वाकोडे (प्रदेश अध्यक्ष),
मा. विश्वासराव आरोटे (प्रदेश सरचिटणीस),
संचालन : निलेश सोमाणी प्रदेश कार्याध्यक्ष

* प्रबोधन सत्र * दुपारी ३.३० ते ५.०० वाजेपर्यंत
उद्घाटक : मा. संजय भोकरे राज्य संघटक
अध्यक्ष : ॲड. सौ. भारती सोमाणी जिल्हा प्रतिनिधी लोकशाही वार्ता
प्रमुख अतिथी : सौ. वृषाली टेकाळे जिल्हा प्रतिनिधी दै. तरुण समता वाणी
विषय : सायबर युगातील माध्यमे आणि मुल्यनिष्ठ पत्रकारीता
वक्ते : मा. डॉ. राजेश राजोरे (जेष्ठ संपादक खामगांव),

सभाध्यक्ष : ह.भ.प. प्रकाश महाराज वाघ सर्वाधिकारी गुरुकुंज सेवाश्रम
उद्घाटक : ह.भ.प. श्री. दामोदर पाटील गुरुजी आजीवन प्रचारक
विशेष अतिथी : ह.भ.प. श्री. बाबाराव पाटील उपसर्वाधिकारी
वक्ते : श्री. गोपाल कडू प्रचार प्रमुख
विषय : संत विचारातून अभिव्यक्ती स्वातंत्र्य

* विनीत *
आयोजन समिती : आ. श्याम खोडे (निमंत्रक), निलेश सोमाणी (आयोजक), गिरधारीलाल सारडा (स्वागताध्यक्ष), डॉ. हरिष बाहेती (मुख्य समन्वयक), देवेंद्र खडसे पाटील (सहस्वागताध्यक्ष), मा. शिवाजीराव वाटाणे (कार्याध्यक्ष) ॲड. भारती सोमाणी, नयन मोंढे (विदर्भ अध्यक्ष), अभय खेडकर (विदर्भ कार्याध्यक्ष), सुनिल फुलारी (विभागीय अध्यक्ष), किरण क्षार (जिल्हाध्यक्ष), पप्पू घुगे (शहर जिल्हाध्यक्ष), राम धनगर (इले. मिडीया जिल्हाध्यक्ष), गणेश देगांवकर (सोशल मिडीया जिल्हाध्यक्ष), कैलाश महाजन (डिजी. मिडीया जिल्हाध्यक्ष), संजय खडसे (डिजी. मिडीया सहजिल्हाध्यक्ष),मोहित कर्णावट (विदर्भ समन्वयक), संजय कडोळे (विदर्भ उपाध्यक्ष), पंकज सोनोणे (प्रदेश सदस्य), रवि अंभोरे, नारायण आरु, प्रफुल बानगांवकर (जिल्हाध्यक्ष पत्रकार हल्ला विरोधी कृती स.), संतोष गुल्हाणे, भागवत गोरख समिर देशपांडे (जिल्हा उपाध्यक्ष), अमोल अघम (जिल्हा उपाध्यक्ष), राजकुमार ठाकुर, संजय राठी, श्याम अपूर्वा, बंडु राठोड, शिवाजी खडसे, ॲड. सुरेश टेकाळे, सौ.वृषाली टेकाळे, विजय घोंगडे

समारोप : वैकुंठधामवासी सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर वाटाणे लॉन वाशिम येथे शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी सायं. ५.०० वा.
राष्ट्रवंदनेने मेळाव्याची सांगता होईल.
प्रवेशद्वार : विदर्भ केसरी स्व. ब्रजलालजी बियाणी
प्रकाशक : दै. तरुण समता वाणी मो. ९४०४८२४२७७/९३२५८४३७८१

# तुकाराम महाराज बीज व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास मातुळ येथे प्रारंभ

भोकर तालुका प्रतिनिधी

भोकर-दरवर्षीप्रमाणे मौजे मातुळ ता.भोकर येथे गेली ६३ वर्षापासून साजरा होत असलेला श्री संत श्रेष्ठ तुकाराम महाराज बीज व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास प्रारंभ.

ह.भ.प. कै. जळबा महाराज हिप्पर्गेकर यांच्या कृपाशीर्वादाने व ह.भ.प. अशोक महाराज यांच्या मार्गदर्शनाने मौजे मातुळ येथे दि.२७/०२/२०२६ ते ०५/०३/२०२६ पर्यंत श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बीज व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तुकाराम चरित्र ग्रंथाचे वाचन व किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताह सोहळ्यातील दैनंदिन कार्यक्रमाची रूपरेषा पुढील प्रमाणे आहे.

सकाळी ४ ते ६ काकडा भजन, स. ७ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० ते ११ गाथा भजन, दुपारी १ ते ४ तुकाराम चरित्र ग्रंथाचे वाचन व निरूपण, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ, सामुदायिक प्रार्थना, रात्री ९ ते ११ हरी किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तन सोहळ्यात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार मंडळी सेवा देणार आहेत. शुक्रवार दि.२७ फेब्रु. ह.भ.प. विष्णुदास महाराज तांदळीकर, शनिवार दि.२८ फेब्रु.ह.भ.प. विश्वंभर महाराज कदम आळंदीकर, रविवार दि.१ मार्च ह.भ.प. केशव महाराज मुलगीर गंगाखेड, सोमवार दि.२ मार्च ह.भ.प. अनिरुद्ध महाराज नालेगावकर जालना, मंगळवार ३ मार्च ह भ प चंद्रकांत महाराज उस्माननगरकर, बुधवार ४ मार्च रोजी सकाळी १० ते १२ गाथा पूजन, व सायंकाळी ४ ते ६ पालखी मिरवणूक, व रात्री ९ ते ११ ह.भ.प.

भागवताचार्य विश्वनाथ महाराज काकांडीकर यांचे हरिकीर्तन होईल, गुरुवार ५ मार्च सकाळी १० ते १२ ह.भ. प. भागवताचार्य विश्वनाथ महाराज काकांडीकर यांचे तुकाराम बीज गुलालाचे कीर्तन व दहीहंडी काल्याचे किर्तन होईल. दुपारी १२ ते सायंकाळी ५ पर्यंत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आल

# अर्धापुरात नदीत तरंगताना आढळला मृतदेह

घातपात की अपघात ? पोलिसांसमोर तपासाचे आव्हान

अर्धापूर : अर्धापूर तालुक्यातील देगाव शिवारात गुरुवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास एका ४० ते ४५ वर्षीय अज्ञात व्यक्तीचा मृतदेह नदीपात्रात आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पिंपळगाव ते कारखाना रोडवरील नदीपात्रात ही घटना उघडकीस आली असून, हा मृत्यू घातपात आहे की अपघात, याबाबत तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

नेमका प्रकार काय ? मिळालेल्या माहितीनुसार, देगाव परिसरातील नदीपात्रात एक मृतदेह तरंगताना स्थानिकांना दिसला. घटनेची माहिती मिळताच बारड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रेय मंठाळे, विजय गायकवाड, शिवराज वाडीकर, दत्ता देशमुख आणि पोलीस पाटील रेखा जाधव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाची दुर्गंधी सुटलेली असल्याने तो बाहेर काढताना पोलिसांना मोठी कसरत करावी लागली.

ओळख पटवण्याचे आवाहन.....

पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात रवाना केला आहे. अद्याप या व्यक्तीची ओळख पटलेली नाही. पोलिसांच्या माहितीनुसार, मयताचे वय ४० ते ४५ वर्षे असून, अंगान पिवळ्या रंगाचा (काळे ठिपके असलेल आणि काळी पॅन्ट आहे. उंची अंदाजे ५ फूट आहे.

# ५०% आरक्षण मर्यादेवर सर्वोच्च न्यायालय ठाम; महाराष्ट्रातील २२ जिल्हा परिषद निवडणुका लांबणीवर

मुखेड प्रतिनिधी:- महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर आज सर्वोच्च न्यायालय येथे महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणुका घेण्यास न्यायालयाने पुन्हा एकदा नकार देत पूर्वीचा आदेश कायम ठेवला आहे.

राज्यातील काही जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी आणि इतर प्रवर्गांना देण्यात आलेल्या आरक्षणामुळे एकूण आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांच्या घटनात्मक मर्यादेपेक्षा अधिक झाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, विशेष परिस्थिती व ठोस सांख्यिकीय आकडेवारीशिवाय ५०% पेक्षा जास्त आरक्षण ग्राह्य धरता येणार नाही. राज्य सरकारची विनंती ही फेटाळली आहे.

राज्य सरकारने अंतिम निकालाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणुका घेण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केली होती. मात्र ५०% मर्यादा आणि 'त्रिस्तरीय चाचणी' पूर्ण न झाल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यास स्पष्ट नकार दिला.

या आदेशामुळे राज्यातील २२ जिल्हा परिषद आणि संबंधित पंचायत समित्यांच्या निवडणुका आणखी लांबणीवर पडणार आहेत. सध्या या ठिकाणी प्रशासकीय यंत्रणेमार्फतच कारभार सुरू असून, लोकप्रतिनिधींची निवड होईपर्यंत हीच व्यवस्था कायम राहण्याची शक्यता आहे.ओबीसी आरक्षण, 'त्रिस्तरीय चाचणी' आणि ५०% मर्यादा या मुद्द्यांवर अंतिम निर्णय होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चिततेत राहणार आहेत. या प्रकरणाचा निकाल राज्याच्या राजकीय व सामाजिक समीकरणांवर दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे.